मुंबई ■ सांगली ■ कोल्हापूर ■ नवे विचार...नवी सुरुवात ■ RNI NO. MAHMAR/2020/79996

दैनिक

# हॅलो प्रभात

■ मुख्य संपादक : गणेश पाटील (सावर्डेकर) Mo. 9011889001

■ सांगली ■ कोल्हापूर ■ सातारा ■ पुणे ■ अहिल्यानगर ■ वर्ष : ६ ■ अंक : १३८ ■ गुरुवार, २१ ऑगस्ट २०२५ ■ किंमत : ३ रुपये ■ पाने : ४




# ठाकरे बंधूंच्या ‘बस’ चे टायर पंक्चर ?

## ‘बेस्ट’ च्या निवडणुकीत मुंबईकरांचा आशीर्वाद हिंदुत्वाच्या स्टॅण्डला

**मुंबई : हॅलो प्रभात**

बेस्ट पतपेढी निवडणुकीत भारतीय जनता पार्टी प्रणीत पॅनल आणि शशांक राव यांच्या पॅनल ला मोठा विजय मिळाला आहे. गेल्या ९ वर्षांपासून वर्चस्व असलेल्या ठाकरे बंधूंच्या उत्कर्ष पॅनेल ला २१ पैकी एकही जागा जिंकता आली नाही.

सर्वच्या सर्व जागा जिंकत भाजपाप्रणीत पॅनेल विजयी झाले. मुंबईकरांचा आशीर्वाद डुप्लिकेट ब्रँडला नाही तर बाळासाहेब ठाकरे यांच्या हिंदुत्वाच्या खऱ्या स्टॅण्डला आहे हे या निकालातून अधोरेखित झाले आहे. ठाकरे बंधूंचे टायर या बेस्ट पतपेढीच्या निवडणुकीत पंक्चर झाले अशी घणाघाती टीका भारतीय जनता पार्टीचे माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन यांनी उबाठा सेनेवर बुधवारी केली. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

‘मुंबईत आमचाच ब्रँड चालणार’ अशा मोठमोठ्या बाता मारणा-या उबाठा चे खा. संजय राऊत यांची बेस्ट पतपेढीच्या निकालानंतर दातखीळ बसली आहे अशा शब्दांत श्री. बन यांनी राऊतांना लक्ष्य केले. बेस्टच्या निवडणुकीत मुंबईकरांनी थेट मतदानातून उबाठाचा धुव्वा उडवला आहे. थेट मतदानामुळे आता राऊत यांना ‘ईव्हीएम, व्होट चोरी’ असे नेहमीचे खोट्या आरोपांचे तुणतुणे वाजवता येणार नाही. खरे तर बेस्ट पतपेढीची निवडणूक पक्षीय पातळीवर घेऊ नये, असं भाजपाचे मत होतं. मात्र ‘सहकारातून स्वाहाकार’ करणाऱ्यांनीच या निवडणुकीत राजकारण आणले.

या निवडणुकीत बेस्ट कर्मचाऱ्यांनी ठाकरे गटाला सणसणीत ठोसा मारून आगामी महापालिका निवडणुकीत ही हिंदुत्वाचा स्टॅण्ड कायम राहील, हे आपल्या मतदानातून दाखवून दिलं आहे. प्रसाद लाड आणि प्रविण दरेकर यांच्या नेतृत्वाखाली मिळालेला हा विजय महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अत्यंत महत्त्वाचा आहे असेही त्यांनी नमूद केले.

मुसळधार पावसामुळे मुंबईत काही भागात अडचणी निर्माण झाल्या. मात्र कार्यतत्पर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तात्काळ यंत्रणा कामी लावली आणि प्रवाशांची सुटका केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आलेल्या संकटाला परतवून लावलं. प्रशासन सक्षम हातात असेल तर संकटाला कसं तोंड देता येतं हे मुंबईकरांनी पाहिलं असेही त्यांनी नमूद केले.

# राज्यात ओला दुष्काळ जाहीर करा : हर्षवर्धन सपकाळ

**मुंबई : हॅलो प्रभात**



राज्यात मागील तीन चार दिवसात मुसळधार पावसाने अनेक भागात पुरस्थिती उद्धवली आहे. या पावसाचे पाणी शेतात शिरून पिकांचे मोठे नुकसान झाले आहे, उभी पिके वाहून गेली आहेत.

अतिवृष्टीमुळे राज्यातील जवळपास १५ लाख एकर पेक्षा जास्त क्षेत्रावरील शेतपिकांचे प्रचंड मोठे नुकसान झाल्याचे समजते. राज्यातील सध्याची परिस्थिती पाहता ओला दुष्काळ जाहीर करा व शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपयांची तातडीने मदत द्या, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या पत्रात हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणतात की, मराठवाडा, विदर्भ व पश्चिम महाराष्ट्रातील जवळपास १७ जिल्ह्यांना या पावसाचा मोठा फटका बसला आहे, उत्तर महाराष्ट्र व कोकणातही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. ज्वारी, बाजरी, उडीद, मका, सोयाबिन, मूग, कापूस, तूर, फळे व भाजीपाल्याचे मोठे नुकसान झाले आहे, हजारो हेक्टरवरील ऊसालाही मोठा फटका बसला आहे, काही ठिकाणी शेतकऱ्याचे पशूधन वाहून गेले आहे तर नांदेड जिल्ह्यात जिवीतहानीही झाली आहे.

राज्य सरकारने पंचनामे करण्याचे आदेश दिले असले तरी सरकारने या कठीण प्रसंगी सर्व नियम, अटी व शर्थी बाजूला ठेवून शेतकऱ्यांची मदत केली पाहिजे. जेथे जिवीतहानी झाली आहे त्यांच्या कुटुंबियांचा सहानुभूतीपूर्ण विचार करून मदत करावी अशी काँग्रेस पक्षाची मागणी आहे, असे प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांनी म्हटले आहे.

तुमचं वृत्तपत्र आता तुमच्या मोबाईलवर!

खालील QR कोड स्कॅन करा आणि आजचा e-paper वाचा.


हॅलो प्रभात

सोबत वाचनाचा नवा डिजिटल अनुभव

सहज,जलद आणि स्मार्ट!

# ‘कर्मयोगिनी आहिल्या’ विषयावर व्याख्यानाचे आयोजन

**इस्लामपूर : हॅलो प्रभात**



महिला राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे ३०० वे जयंती वर्ष साजरे केले जात आहे. त्यानिमित्त शनिवार दि.२३ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी ४ वा. इस्लामपूर- ताकारी रस्त्यावरील बी.के.पॅलेसमध्ये राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या चरित्र व कार्याचे अभ्यासक, लेखक प्रा. डॉ. मानसिंग ठोंबरे यांचे ‘कर्मयोगिनी आहिल्या’ या विषया वर जाहीर व्याख्यान आयोजित केले आहे. कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठातील अहिल्यादेवी होळकर अध्यासनचे समन्वयक प्रा.डॉ.मच्छिंद्र गोफणे कार्यक्रमाचे अध्यक्ष आहेत. या समारंभास माजी मंत्री आ.जयंत राव पाटील प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत.

महिला राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या उरूण-इस्लाम पूर शहराध्यक्षा सौ.पुष्पलता विनायक खरात,तालुकाध्यक्षा सौ.सुनीता संतोष देशमाने या समारंभाच्या निमंत्रक आहेत. या समारंभास उपस्थित सर्वांना कर्मयोगिनी अहिल्या हा चरित्र ग्रंथ भेट दिला जाणार आहे. राजारामबापू पाटील ज्ञान प्रबोधिनीचे अध्यक्ष प्रा.शामराव पाटील यांच्या सह राजारामबापू समूहातील पदाधिकारी या समारंभास उपस्थित राहणार आहेत. या समारंभास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन निमंत्रक सौ.पुष्पलता खरात व सौ.सुनिता देशमाने यांनी केले आहे.

या कार्यक्रमाच्या तयारीसाठी इस्लामपूर येथील पक्ष कार्यालयात प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक घेण्यात आली. तालुकाध्यक्ष विजयराव पाटील, शहराध्यक्ष शहाजी पाटील, अरुणादेवी पाटील, दादासाहेब पाटील, मुनीर पटवेकर, सुनील मलगुंडे, अविनाश खरात, लालासाहेब वाटेगावकर, आनंदराव दवणे विलास बिरु ताटे, कमल पाटील, रोझा किणीकर, मनिषा पेठकर, शैलजा जाधव, सुनंदा साठे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

# काळजी करु नका, मदतीसाठी मी तुमच्याबरोबर

### पुरस्थितीची निशिकांत भोसले-पाटील यांच्या कडुन पहाणी

**ईश्वरपुर : हॅलो प्रभात**



काळजी करु नका,लागेल त्या मदतीसाठी मी तुमच्या बरोबर असा भावनीक आधार इस्लामपुर विधानसभा मतदार संघातील पुरग्रस्त गावातील नागरीकांना राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टी चे सांगली जिल्हाध्यक्ष निशिकांत भोसले- पाटील यांनी दिला.यावेळी गट विकास अधिकारी आबासाहेब पवार,मंडल अधिकारी,ग्रामविकास अधिकारी यांची उपस्थिती होती.

सध्या पावसाचा जोर वाढला असुन ओढे व नदी पात्रातील पाणी पातळी वाढली आहे.यामुळे नदी काठच्या गावातील नागरीकांच्या मध्ये भिती चे वातावरण निर्माण झाले आहे. काही गावामध्ये नदी पात्रातील पाणी शिरले आहे, अशा गावांना व गावातील नागरीकांना निशिकांत भोसले-पाटील यांनी रेठरेहरणाक्ष, बिचुद, नरसिंहपुर, शिरटे, कोळे, बहे आदि गावांना व समक्ष भेटी देऊन पुर परिस्थितीची पहाणी केली. नागरीकांच्या सुरक्षे च्या दृष्टीने लागेल ती मदत मी करणार आहे, मी तुमच्या बरोबर असुन काळजी करुन नका असा आधार दिला.

याचबरोबर प्रशासन अधिकारी यांना ही उपाय योजनेच्या दृष्टीने सुचना दिल्या. यावेळी प्रकाश हॉस्पिटल अँण्ड रिसर्च सेंटर चे मानद सचिव धैर्यशील मोरे, सरपंच शोभाताई जगताप, निवास पाटील, यदुराज थोरात, दिलीप लाड, जयवंत देसाई, सुनील पाटील, सुभाष जगताप, शिरीष रसाळ, संग्राम पाटील, संग्राम कोळेकर यांच्यासह नागरीक उपस्थित होते.

### आपत्ती व्यवस्थापनासाठी यंत्रणा अलर्ट मोडवर

**सांगली : हॅलो प्रभात**

कृष्णा व कोयना नदीच्या पाणीपातळीत वाढ झाली आहे. या पार्श्वभूमिवर जिल्ह्यातील सर्व प्रमुख यंत्रणा अलर्ट मोडवर असून, सांघिक आपत्ती व्यवस्थापनासाठी दक्ष आहे. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी वेळोवेळी आढावा घेऊन तातडीच्या उपाययोजना केल्या जात आहेत.

# संक्षिप्त...

### अमृत बोरकर यांना गुणवंत कामगार पुरस्कार

**पुणे : हॅलो प्रभात**



लोणी काळभोर येथील रहिवाशी अमृत बोरकर यांना स्वातंत्र्य दिनानिमित्त पी एम पी एम एल चे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गुणवंत कामगार पुरस्काराने गौरवण्यात आले. यावेळी वाहतूक विभागाचे अधिकारी सतीश गव्हाणे, आशा राऊत,आणि फायनान्स अधिकारी योगेश होले आदी मान्यवर उपस्थित होते. अमृत बोरकर यांना मानाचा गुणवंत कामगार परस्कार मिळाल्याबदल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### तासगाव तालुक्यात ’लोकअदालती’चे आयोजन

**तासगाव : हॅलो प्रभात**

तासगाव तालुक्यातील प्रांताधिकारी व तहसीलदार यांच्या न्यायालयात प्रलंबित असणाऱ्या अर्धन्यायिक प्रकरणांचा जलद निपटारा करण्यासाठी महसूल विभागातर्फे २९ ऑगस्ट व ३ सप्टेंबर रोजी विशेष ’लोकअदालती’चे आयोजन करण्यात आले आहे. या लोकअदालतीत नागरिकांची प्रकरणे तातडीने मार्गी लावली जाणार आहेत, अशी माहिती तहसीलदार अतुल पाटोळे यांनी दिली.

### पालकमंत्र्यांच्या हस्ते जलपूजन

**सातारा : हॅलो प्रभात**

कोयना धरणात ९६.३८ टक्के टी.एम.सी. पाणीसाठा झाला आहे. या धरणातील जलाशयातील जलपूजन पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी केले. कोयना धरणस्थळी झालेल्या जलपुजन कार्यक्रमास जिल्हाधिकारी संतोष पाटील, याशनी नागराजन, तुषार दोशी, अभय काटकर आदी उपस्थित होते.

# राष्ट्रीय एनर्जी ऑडीट स्पर्धेत अनंतराव पवार अभियांत्रिकीचे यश



**पुणे : हॅलो प्रभात**

अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च महाविद्यालयाच्या मेकॅनिकल अभियांत्रिकी विभागातील विद्यार्थ्यांनी व्हीआयटी वेल्लोर येथे झालेल्या राष्ट्रीय एनर्जी ऑडीट स्पर्धेत सहभाग नोंदवून तृतीय क्रमांक पटकाविला.

या राष्ट्रीय एनर्जी ऑडीट स्पर्धेत पन्नास हून अधिक नामांकित महाविद्यालयाशी झालेल्या स्पर्धेत अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च महाविद्यालयाने तृतीय क्रमांक मिळिवला.या स्पर्धेत चतुर्थ वर्षातील जिगीषा जनगुडे, उत्तम प्रजापती आणि तृतीय वर्षातील युगंधर गांगुल या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

या विद्यार्थ्यांना प्रा.निलेश जाधव व प्रा. संपदा अहिरराव यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी एक्सइव्हीइ इलेक्ट्रिक फोरव्हीलरचा ऑडीट रिपोर्ट वेल्लोर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी तामिळनाडू येथे सादर केला. सदर स्पर्धेत विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या पॉवर इलेक्ट्रॉनिक्स, पॉवर ट्रान्समिशन, एनर्जी कन्झशन, एनर्जी कन्झर्वेशन या निकषांवर या राष्ट्रीय एनर्जी ऑडीट स्पर्धेत निवड करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या सरचिटणीसप्रमिला गायकवाड यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील ठाकरे, अंतर्गत गुणवत्ता कक्षाचे समन्वयक प्रा.गणेश कोंढाळकर, विभागप्रमुख डॉ. दत्तात्रय कांबळे, मार्गदर्शक प्रा.निलेश जाधव व प्रा. संपदा अहिरराव यांचे अभिनंदन केले.

# कवठेमहांकाळ येथे भव्य दोस्ती दहीहंडीचे आयोजन

### संदीप गिड्डे -पाटील ; ५ लाख ५५ हजार ५५५ रुपये विक्रमी बक्षीस

**कवठेमहांकाळ : हॅलो प्रभात**



कवठेमहांकाळ येथे दि-२५ ऑगस्ट रोजी सायंकाळी सात वाजता तब्बल ५ लाख ५५ हजार ५५५ रुपये विक्रमी बक्षीस असलेली पश्चिम महाराष्ट्रातील सर्वात मोठी दोस्ती दहीहंडी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. भारतीय जनता पक्ष व सर्वोत्तम फाउंडेशन कवठेमंकाळ यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री यांच्या ५५व्या वाढदिवसानिमित्त या दहीहंडीचे आयोजन करण्यात आले आहे. जत विधानसभा मतदार संघाचे आमदार गोपीचंद पडळकर,भाजपा किसान मोर्चाचे संदीप गिड्डे- पाटील, भाजप राज्य परिषद सदस्य मिलिंद बापू कोरे यांच्या मार्गदर्शनाखाली दहीहंडीचे नियोजन केले आहे.

शहरातील जनता शिक्षण संस्थेच्या महांकाली हायस्कूल व महिला विद्यालयाच्या भव्य क्रीडांगणावर दहीहंडी आयोजित करण्यात आली आहे. या दहीहंडी वेळी गुलाबी साडी फेम सुप्रसिद्ध कलाकार संजू राठोड उपस्थित राहणार आहेत. खास मनोरंजन कार्यक्रम, आकर्षक विद्युत रोषणाई असणार आहे. महिलांसाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था केली जाणार आहे.

पश्चिम महाराष्ट्रातील सर्वात मोठी असलेल्या दोस्ती दहीहंडीसाठी राज्यातील व पश्चिम महाराष्ट्रातील भाजपाचे नेते मंडळी उपस्थित राहणार आहेत.कवठेमहांकाळ तालुक्यातील नागरिकांना दहीहंडी पाहण्याची संधी मिळणार असून सर्वांनी वेळेवर उपस्थित राहण्याचे आवाहन भाजपाचे राज्य परिषद सदस्य मिलिंद बापू कोरे व किसान मोर्चाचे प्रदेश सरचिटणीस गीड्डे -पाटील यांनी केले आहे.

# आत्मनिर्भरपणा येण्यासाठी महिलांनी प्रशिक्षण घेतले पाहिजे : डॉ.ज्योती आदाटे

**सांगली : हॅलो प्रभात**




महिला कुठेच कमी नसतात. त्यांचा आत्मविश्वास जागा झाला पाहिजे. आपण किती कमावतो, यापेक्षा जिद्द ठेऊन स्वबळावर उभे राहण्याचा प्रयत्न करतो हे फार महत्त्वाचे आहे.

चिकाटीने कष्ट करीत राहिला तर यश नक्कीच मिळेत, तसेच आपल्या वस्तूंचे मार्केट सुध्दा मिळवता आले पाहिजे, आत्मनिर्भरपणा येण्यासाठी महिलांनी प्रशिक्षण घेतले पाहिजे, असे प्रतिपादन महिला आघाडी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या प्रदेश सरचिटणीस डॉ.ज्योती आदाटे यांनी केले.स्वातंत्र्यदिनानिमित्त स्कील इंडिया अंतर्गत अष्टभुजा प्रतिष्ठान या संस्थेमार्फत चालविण्यात आलेल्या महिलांना मोफत प्रशिक्षणाचा समारोप व बक्षिस वितरण कार्यक्रम पार पडला.

त्या पुढे म्हणाल्या, संस्था महिलांसाठी जे कार्यक्रम राबवित आहे, त्याचे कौतुक आहे. अशी प्रशिक्षण शिबिरर प्रत्येक भागात झाली पाहिजेत, जेणेकरून महिला स्वबळावर उभ्या राहतील. यासाठी काही मदत लागेल ती करावयास आम्ही तत्पर आहोत, अशी ग्वाही दिली.

कल्पना शेळके, तसेच आयेशा मुलाणी, प्रशिक्षक निलम डाके, निरंजन परमाने, प्रमोद जाधव, मीना जांबोटी, सुनंदा राठोड, प्रभावती आदाटे, अंनिसची कार्यकर्ती प्रियांका तुपलोंडे उपस्थित होते. ज्योती आदाटे यांना मानद डॉक्टरेट पदवी मिळाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.






# आशिया करंडकावर पुन्हा भारताचे नाव कोरावे

पुढील महिन्यात ९ सप्टेंबर ते २८ सप्टेंबर या कालावधीत दुबई येथे टी २० सामन्यांची आशिया करंडक स्पर्धा होणार असून या स्पर्धेसाठी निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर यांनी १९ तारखेला १५ सदस्यीय भारतीय संघाची घोषणा केली. आशिया करंडक स्पर्धेत भारतीय संघाचे नेतृत्व मधल्या फळीतील भरवशाचा फलंदाज सूर्यकुमार यादव हा करेल तर कसोटीतील भारतीय संघाचा युवा कर्णधार शुभमन गिल हा या संघाचा उपकर्णधार आहे. या भारतीय संघाच्या डावाची सुरुवात संजू सॅमसन व युवा अभिषेक शर्मा हे करतील. संजू अनुभवी तर अभिषेक युवा खेळाडू आहे. संजू आणि अभिषेक हे भारताचे अनुभवी आणि युवा खेळाडू भारताच्या डावाची धडेकबाज सुरवात करतील यात शंका नाही. यांच्यासोबत तिसरा सलामीवीर म्हणून शुभमन गिलची निवड करण्यात आलेली आहे. शुभमन गिल तिसऱ्या क्रमांकावरही खेळू शकतो. मधल्या फळीची जबाबदारी कर्णधार सूर्यकुमार यादव, तिलक वर्मा आणि रिंकू सिंग यांच्यावर आहे. संजू सॅमसन हा सलामीवर यष्टिरक्षणही करेल. तो भारताच्या पहिल्या पसंतीचा यष्टिरक्षक आहे. जितेश शर्मा याची अतिरिक्त यष्टीरक्षक म्हणून निवड करण्यात आली आहे. विशेष म्हणजे तो उत्तम फिनिशर म्हणूनही आपली जबाबदारी पाडू शकेल. भारताची फलंदाजी अतिशय बलवान असून संजू सॅमसन, अभिषेक शर्मा आणि शुभमन गिल हे पहिल्या तीन क्रमांकाचे फलंदाज जगातील सर्वोत्तम फलंदाज मानले जातात. टी २० सामन्यात या तिघांची कामगिरी उत्तम असून तिघेही टी २० सामन्यातील श्रेष्ठ फलंदाज समजले जातात. स्थानिक क्रिकेट असो की आयपीएल किंवा आंतरराष्ट्रीय टी २० क्रिकेट या तिघांची कामगिरी त्यांच्या लैकिकास साजेशी झालेली आहे त्यामुळे त्यांच्या निवडीवर कोणीही प्रश्नचिन्ह उपस्थित करू शकत नाही. त्यांची निवड भारतासाठी सुचिन्ह आहे त्यांनी जर चांगली सुरुवात केली तर भारताचे निम्मे काम फत्ते होईल. टी २० सामन्यात धडाकेबाज सुरुवात होणे महत्वाची आहे आणि हे तिघेही धडाकेबाज खेळीसाठी प्रसिद्ध आहे. चौथ्या क्रमांकावर युवा तिलक वर्मा येईल तो भारताचा भरवशाचा फलंदाज असून मिळालेल्या संधीचे सोने कसे करायचे हे त्याला चांगले ठाऊक आहे. तो फ्लॉप गेला तर त्याची जागा रिंकू सिंग घेईल. तो मैदानात सर्वत्र फटकेबाजी करू शकतो. तोही भारताचा भरवशाचा फलंदाज मानला जातो. त्यानंतर कर्णधार सूर्यकुमार यादव हा धडाकेबाज फलंदाज मैदानात येईल. तो स्फोटक फलंदाज असून मॅच फिनिशर आहेत. कमी चेंडूत जास्त धावा काढून संघाला विजय मिळवून देण्यात त्याचा हातखंडा आहे. त्यानंतर हार्दिक पांड्या हा जगातील सध्याचा सर्वोत्तम अष्टपैलू खेळाडू येईल. तो गोलंदाजी, तडाखेबंद फलंदाजी आणि प्रभावी क्षेत्ररक्षण करून संघाच्या विजयात मोलाची भूमिका बजावतो. त्याने आपल्या अष्टपैलू खेळीने भारताला अनेक विजय मिळवून दिले आहेत. शिवम दुबे हा आणखी एक अष्टपैलू खेळाडू भारतीय संघात आहे. मध्यमगती गोलंदाजी आणि तडाखेबंद फलंदाजी हे त्याचे वैशिष्ट्ये आहे. गोलंदाजीमध्ये निवड समितीने तीन फिरकी गोलंदाजांना संधी दिली असून अनुभवी अक्षर पटेल सोबत फॉर्मात असलेला चायनामन गोलंदाज कुलदीप यादव आणि ऑफ स्पिनर वरुण चक्रवर्ती यांना संधी मिळाली आहे. कुलदीप आणि अक्षर दोघेही डावखुरे मंदगती गोलंदाज आहेत मात्र त्यांच्यात विविधता आहे. अक्षर पटेल अर्थोडॉक्स स्पिनर आहे तर कुलदीप चायनमन गोलंदाज आहे त्यामुळे जरी ते डावखुरे असले तरी त्यांच्यात विविधता आहे. आणि दोघेही चांगल्या फॉर्ममध्ये आहे अक्षर पटेल हा भारताचा सर्वोत्तम मंदगती गोलंदाज आहे शिवाय तो फलंदाजीही करतो आणि चांगला क्षेत्ररक्षक आहे म्हणजे तो एक उत्कृष्ट अष्टपैलू खेळाडू आहे. वरुण चक्रवर्ती हा मिस्ट्री गोलंदाज भारतीय संघात आहे. त्यांची ऑफस्पिन भल्या भल्या फलंदाजाला बुचकळ्यात टाकते. जुन्या आणि नव्या खेळाडूंना संधी देत जोश आणि होश यांचे संतुलन साधण्याचा प्रयत्न निवड समितीने केला आहे त्यात ते बऱ्यापैकी यशस्वीही ठरले आहेत. श्रेयस अय्यर, यशस्वी जयस्वाल आणि मोहम्मद सिराज या अनुभवी खेळाडूंची निवड न झाल्याचे दुःखही आहे मात्र निवड समिती फक्त पंधरा सदस्यांचा संघ निवडू शकते त्यामुळे इच्छा असूनही निवड समितीला या खेळाडूंना या संघात निवडता आले नसेल मात्र भविष्यात त्यांना नक्की संधी मिळेल त्यामुळे त्यांनी नाउमेद होऊ नये. आशिया करंडकासाठी निवडण्यात आलेला हा संघ संतुलित आहे हे मान्य करून नीवड समितीचे याबाबत अभिनंदन करावे लागेल. आता जबाबदारी आहे ती निवडण्यात आलेल्या या १५ खेळाडूंनी आपल्याला मिळालेल्या संधीचे सोने करून आशिया करंडकावर पुन्हा भारताचे कोरावे. आशिया करंडकावर भारताचे नाव कोरण्यासाठी हे खेळाडू जीवाचे रान करतील आणि १४५ कोटी भारतीयांना आशिया करंडक जिंकून देतील यात शंका नाही. या स्पर्धेसाठी निवड झालेले सर्व खेळाडू अनुभवी आहेत. टी २० सामने खेळण्याचा सर्वांना मोठा अनुभव आहे आणि सर्वात महत्वाचे म्हणजे ही स्पर्धा दुबईत होणार आहे. संघात निवड झालेल्या सर्व खेळाडूंना दुबईत खेळण्याचा चांगला अनुभव आहे त्यामुळे देशासाठी सर्वोत्तम कामगिरी करून भारताला पुन्हा एकदा आशिया करंडक जिंकून देण्याची जबाबदारी ते यशस्वीपणे पार पाडतील अशी आशा करूया.

# ज्येष्ठ नागरिक अन् सद्यस्थिती...



जागतिक स्तरावर २१ ऑगस्ट हा ज्येष्ठ नागरिक दिन म्हणून साजरा केला जातो. अशा प्रकारे जे दिवस साजरे केले जातात. त्याचा मुख्य हेतु त्या दिवसाचे आणि विषयाचे महत्व तर समजून घ्यावयाचेच पण त्यासंदर्भात आपले कर्तव्य काय आहे लक्षात घेऊन आपण आपले कर्तव्य योग्य रितीने पार पाडात आहोत की नाही, याची चाचपणी करुन आवश्यक ते बदल तात्काळ आपल्यामध्ये करून घेणेही महत्त्वाचे आहे.

ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त, जे आता ज्येष्ठ नागरिक म्हणजे ६० वर्षावरील वयोगटात आहेत ते तसेच ज्यांच्याबरोबर ही मंडळी राहतात, ते त्यांचे नातेवाईक, आप्तमंडळी या सर्वांचेसाठी ज्येष्ठ नागरिक ही वस्तुस्थिती आहे, ती 'वरदान' आहे, तो शाप होता कामा नये अशा पद्धतीने वागले पाहिजे. आपल्या भारतीय संस्कुतीत तर ५० वर्षालाच गृहस्थाश्रम संपतो आणि ५१ वर्षानंतर वानप्रस्थाश्रम सुरु होतो तो ७५ वर्षांपर्यंत, ७५ वर्षांनंतर संन्यासाश्रम सुरु होतो, अशी संकल्पना आहे. गृहस्थाश्रम संपत येत असतानाच, आपण स्विकारलेल्या सर्व जबाबदाऱ्या योग्य पद्ध्तीने, आपल्या पुढील पिढीकडे सुपुर्द करावयाच्या आणि आवश्यक असेल किंवा गरज भासेल तेंव्हा आपल्या अनुभवाचा लाभ त्याना देत Retired but not tirede या युक्तीने आपला वेळ आपल्या अनुभवाचा लाभ जेथे-जेथे देता येईल अशा सामाजिक संस्थामध्ये कार्यरत तर रहावेच, पण त्यापासून अपेक्षा मात्र काहीही ठेवू नये. याचबरोबर आपले आत्मकल्याण साधण्यासाठी स्वाध्याय, आत्मनिरीक्षण, चिंतन करुन आनंदानी जगण्यासाठी अखेरपर्यंत प्रयत्नशील राहणे अपेक्षित आहे.

### सध्या प्रत्यक्षात काय घडत आहे !

प्रत्यक्षात ६० वर्षावरील वयाचे लोक ज्येष्ठ नागरिकापेक्षा वद्ध नागरिक या भुमिकेतून जगत आहेत. स्वतः हसत, इतराना हसवत, निर्भय आणि निर्भार होऊन जगण्याऐवजी, बऱ्याच प्रमाणात चिंता, असुरक्षित भाव, आपणास कोण आता विचारत नाही, अशा भावनेने नाईलाज म्हणून जगणाऱ्यांची संख्या या वयोगटात वाढत चालली आहे. अशा मनोवृत्तीला वेळीच आळा घातला पाहिजे. वास्तविक ६० वर्षानंतर आपले व्यक्तीगत जीवन खऱ्या अर्थाने जगण्याची संधी आहे. मानवी जीवनाचा उद्देश जर आपण लक्षात ठेवला, तो म्हणजे आपले आत्मकल्याण साधावयाचे आणि यासाठी बाहय गोष्टी, धन, रस्ता, पद, मान सन्मान याची फारसी गरज नसते व ते काय असते याचा अनुभव आपण घेतलेला असतोच. चांगल्यापैकी जगण्यासाठी आवश्यक ती आर्थिक तरतूद तर आपण सामान्यपणे केलेली असतेच, आवश्यक आहे, ते म्हणजे आपले 'मन' आणि 'वेळ' विधायक कार्यात गुंतवणे आणि याबरोबरच आपले 'आरोग्य' सांभाळणे ! यासाठी आपण पुढील गोष्टी सहज करु शकता.

आपण ६० वर्षाचे झालो, म्हणजे म्हातारे झालो, आता आपले संपले असे कधीही समजू नका ! म्हातारपण त्याला म्हणावयाचे, की ज्याच्यामुळे आपली कार्यक्षमता कमी-कमी होऊ लागते, उत्साह कमी होऊ लागतो, तब्बेतीच्या तक्रारी वाढू लागतात. म्हातारपण हे तीन प्रकारचे आहे. एक म्हणजे वय वाढलेले (हे जन्मतारखेपासुन सुरु होते) याला क्रोनालॉजिकल एजिंग (Chronological) म्हणतात, दुसरे कारण शारीरिक स्थिती- ज्याचा संबंध आपल्या आरोग्याशी निगडित आहे याला (Biological) म्हणतात आणि तिसरा प्रकार मानसिक अवस्थेमुळे ज्याला (Phychological) म्हणतात. यातील जन्मतारखेवरुन आपण अमूक वर्षांचे झालो - हे टाळता येत नाही. पण बाकीची जी दोन कारणे आहेत ती म्हणजे बायोलॉजिकल एजिंग आणि सायकॉलॉजिकल एजिंग यावर आपण लक्ष देण्याचे आहे. त्यावर मात करता येते अगदी अखेरपर्यंत कार्यक्षम जीवन जगता येते.

### आरोग्य हीच संपत्ती

सर्वांत महत्वाचे म्हणजे आपले आरोग्य सांभाळणे. खरे म्हणजे याचे नियोजन पहिल्यापासून केले पाहिजे. आरोग्य म्हणजे सर्व काही नसले तरी, विना आरोग्य सर्व काही निरर्थक वाटते. पण आजारी पडले पाहिजे असा काही कायदा नाही. जर आपण योग्य तो आहार, योग्य तो व्यायाम, विश्रांती, नियमितपणे घेण्याचे ठरविले तर आरोग्य हा प्रश्नच निर्माण होत नाही. आवश्यक वाटल्यास योग्य तो औषधोपचार - उदा. रक्तदाब, मधुमेहसारख्या व्याधी असतील तर त्याचाही लाभ घ्यावयाचा आहे. पण मनात एक संकल्प करावयाचा आहे तो म्हणजे मरेपर्यंत आपणास दुसऱ्याकडून सेवा करुन घ्यावी लागणार नाही. अशा पद्धतीने जगावयाचे आहे. आपण आपल्या पायांनीच चालावयाचे, स्वतःच्या हातानीच जेवावयाचे इ. कसलेही परालंबित्व आपल्याला नको. याच्याच जोडीला सर्वांत महत्वाचे म्हणजे 'चित्त ठेवारे प्रसन्न'. आपलं जगणं आणि वागणं आपल्याकडून असे ठेवावयाचे की, आपणास बघून कोणी कपाळावर आठ्या घालता कामा नये किंवा आपण कोणाकडे बघून कपाळावर आठ्या घालावयाच्या नाहीत. माणसाला अकाली वृद्ध करणारे कारण म्हणजे निराशा, तणाव (टेंशन) कशाची ना कशाची भिती ! विशेषतः मत्युची भीती आणि जस जसे

## २१ ऑगस्ट : जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन


वय वाढू लागते, तसे, जर आपण योग्य तो दृष्टिकोन जोपासला नाही तर ही भीती निराशा-अनिच्छतता वृत्तीने जगण्याची सवय आणखीन बळावते. याला उत्तम उपाय म्हणजे आपण आपले मन विधायक कामात, वाचन करण्यात, ज्यामध्ये आपणास आनंद होतो अशा गोष्टी म्हणजे बागकाम, संगीत ऐकणे, यामध्ये घालवावा. याहीपेक्षा उत्तम म्हणजे आपण योगसाधना शिकून घेतली नसेल तर योग्य त्या मार्गदर्शकाकडून ध्यान-प्राणायाम ह्या क्रिया शिकून त्याचा नियमितपणे सराव करावा. विशेषतः 'शवासन' या आसनाचा मुख्य उद्देश समजून त्याचा सराव करण म्हणजे एक अर्थाने 'मृत्युंजय' होणे हे आहे. याच्या जोडीला सर्वात सोपा आणि परिणामकारक उपाय म्हणजे 'हास्य योग' मानसिक तणाव, भीती यावर हा अनमोल उतारा आहे हास्य. हल्ली अनेक ठिकाणी हास्य योग किंवा हास्य क्लब चालतात. त्याचे सदस्यत्व घ्यावे. याचा फायदा म्हणजे तेथे आपणाकडून काही व्यायामही करुन घेतले जातात. सर्वांचेबरोबर हसणे. मन मुराद हसणे झाले की मन प्रसन्न राहते. आणि तोच 'मूड' जर आपण टिकवू शकलो, तर त्याचा विश्वास न बसेल इतका आपल्याला आरोग्याच्या दृष्टिने फायदा होतो. वाढीव रक्तदाब असेल तर तो काही प्रमाणात खाली येतो, रक्तातील साखर वाढली असेल तर ती कमी होऊ लागते. एवढेच नव्हे तर चेहऱ्यावरच्या सुरकुत्या कमी होऊ लागतात, सर्वसाधारण रोगप्रतिबंधक शक्ती वाढू लागते. म्हणून तर म्हणतात,

**'जसे वय वाढू लागते तसे 'खाना करो आधा, पानी पियो दुगना, चलना करो त्रिगुना ओर हसना करो चोगुना'.**

विशेष म्हणजे अशा ज्येष्ठ नागरिक किंवा हास्य क्लबचे सदस्यत्व घेतले, तर समविचारी मित्रमंडळी भेटतात. आपल्या समस्यांवर विचारांची देवाण-घेवाण होते. मानसिक स्तरावर प्रसन्न राहणे, निदान वैतागून-तणावयुक्त न राहणे हे अत्यंत आवश्यक आहे. बरीच मंडळी भजनी मंडळांमध्ये सहभागी होतात. कोणताही मार्ग अवलंबल्यास हरकत नाही. पण तो असा असावा, की स्वतः प्रसन्न वृत्तीने रहावे, पण त्याचा इतरांना त्रास होणार नाही, याची काळजी घ्यावी.

### इतरांशी संबंध

व्यक्तीगत आरोग्य उत्तम असणे जितके महत्वाचे आहे, किंबहूना त्याहून अधिक महत्वाचे म्हणजे आपण ज्यांचेबरोबर राहतो, त्याच्याशी आपले संबध कसे आहेत. आपली कोणास भीती वाटु नये की कटकट. वाटल्यास आदरच वाटावा असे संबध हवेय. याचा सरळ सोपा-साधा मार्ग- म्हणजे इतरांकडून मान-सन्मान याची अपेक्षा ठेवू नये, त्याचबरोबर न विचारता कोणाला उपदेश करु नये. जर आपणास काही सांगावेसे वाटले, तर त्याचे निवेदन तयार करावे. आपल्या म्हणण्याचा आग्रह धरु नये. आपल्यावर आपल्या बालपणी झालेले संस्कार व आताच्या पिढीवर झालेले संस्कार व सध्याचे वातावरण, त्यांच्या अपेक्षा यात बराच फरक आहे. हे लक्षात ठेवून आपणास वाटते तसेच व्हावे, हा आग्रह नसावा. अन्यथा आपण आपल्याच कुटुंबातील सदस्यांना 'कटकट' वाटू लागतो. यासाठी ज्या काही चांगल्या गोष्टी घडत असतात, त्यांचे मुक्त कंठाने कौतुक करावे, सर्वांच्या वाढदिवस, लग्नाचे वाढदिवसात सहभागी व्हावे, काहींच्या हातून काही कळत न कळत चुकाही होत असतात, त्यांना क्षमा करावी, आपण चुकलो असू तर क्षमाही मागावी, आता आपले काम आपणाकडे जे आहे, ती अतिरिक्त संपत्ती, अनुभव हे गरजुंसाठी वाटण्यासाठी आहे. तो देण्याचा आनंद घ्यावयाचा. आता दुसयांकडून काहीही अपेक्षा करायची नाही. फक्त मैत्री, प्रेम, सहकार्य अशा प्रत्यक्ष वागण्यानेच आपले इतरांशी संबंध चांगले राहणार आहेत.





### वेळेचा सदुपयोग

ज्येष्ठ वयाची मंडळी अशा स्थितीत आहेत की त्यांना आपली उपजिवीका चालण्यासाठी काही उद्योग करावा लागत नाही. त्यामुळे 'वेळ' हा तसा प्रश्न नाही. पण प्रश्न पडतो वेळ कसा घालवायचा! सर्वांत प्राधान्याने आपल्या आरोग्यासाठी वेळ द्यावा. योग, नियमित चालणे, हास्य, क्लब, ज्येष्ठ नागरिक क्लब यामध्ये उपस्थित राहून लागेल तितका वेळ तिथे द्यावा. यानंतर सामाजिक कार्य म्हणजे आपल्या अनुभवांचा जर कोणास लाभ होत असेल तर त्यांना देणे, शिक्षक असाल तर विद्यार्थांना शिकवणे, इ. विविध कार्यक्रम लग्ने, मुंजी, राष्ट्रिय, धार्मीक कार्यक्रमांना उपस्थिती लावणे.

यानंतर एखादा छंद जपावा, यासाठी संगीत शिकणे, ऐकणे, चित्रकला, एखादा बैठा खेळ नियमित खेळणे, बागकाम, साहित्य वाचन, लिखाण करीत असाल तर लिखाण करावे.

वर्षातून ३-४ वेळा, निरनिराळी प्रेक्षणीय ठिकाणे, धार्मिक ठिकाणे यांना भेट देऊन पर्यटनालाही आपल्या जीवनात स्थान देणे. एखादा दुसरा परदेश दौरा किंवा पूर्ण भारत आपण पाहिला पाहिजे.

अर्थात हे सर्व करीत असताना, आपण मनुष्य म्हणून जन्माला आलो आहे आणि या मनुष्य जन्माचा उत्तम उपभोग तर घ्यायचा असून इतरांसाठी उपयोगही करावयाचा आहे आणि तो म्हणजे वाल्याचा वाल्मिकी होणे, वर्धमानाचा महावीर होणे, सिद्धार्थाचा गौतम होणे! यासाठी नियमितपणे अध्यात्मिक साधना करुन आपल्यातील क्रोध, लोभ, काम, मोह, अंहकार मत्सर या राक्षसी प्रवत्तीपासून मुक्ती साधून, मैत्री करुणा, मुदिता, समता, वृत्तीमध्ये जगणं यालाच भारतीय भाषेत 'तस्मात योगीभव' असे म्हणतात. तसे होण्याचा संकल्प या 'ज्येष्ठ नागरिक दिनाचे निमित्ताने' आपण सर्व ज्येष्ठांनी करावा एवढीच सर्वांना सदिच्छा..!

# डॉ.पतंगराव कदम महाविद्यालयात 'एड्स समजून घेताना' वर चर्चासत्र

सांगली : हॅलो प्रभात

येथील भारती विद्यापिठाच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र विभाग व रेड रिबन क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक युवा दिनाचे औचित्य साधून एड्स समजून घेताना या विषयावर चर्चासत्राचे आयोजन केले होते.या चर्चासत्राचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. एस.व्ही.पोरे होते.

अध्यक्षीय मार्गदर्शनात ते म्हणाले की, एचआयव्ही सारख्या विषाणूचा व एड्स आजाराचा अभ्यास सूक्ष्मजीवशास्त्रज्ञ करीत असतात. याची बाधा कशी होते ते सर्व स्वयंसेवकांनी समजून घेवून आजाराच्या उच्चाटनासाठी कार्य केले पाहिजे याकरिता महाविद्यालयीन युवकांची भूमिका महत्त्वाची आहे. या आजारात बळी पडण्याचे सगळ्यात



जास्त प्रमाण हे युवा वर्गाचे आहे. याचबरोबर ही माहिती स्वतः पुरतीच मर्यादित न ठेवता ती माहिती समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचवणे हे युवकांचे काम आहे. विविध समाजोपयोगी उपक्रमांचे कौतुक केले. सदर कार्यक्रमाकरिताभारती के.भावीकट्टी व डॉ. जी. व्ही. माळी हे मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. प्रथम सत्रात भारती भावीकट्टी यांनी मार्गदर्शन केले. द्वितीय सत्रात डॉ. जी. व्हि. माळी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सदर मार्गदर्शनात त्यांनी रेड रिबन क्लब ची स्थापना कधी झाली व ते देशभरात कसे कार्यरत आहे याबद्दलची इत्यंभूत माहिती विद्यार्थ्यांना दिली. एडसब या शब्दाचा उलगडा मराठीत करून दिला. याचबरोबर त्यांनी सदर आजार कसा पसरतो व त्यासाठी जनजागृती किती महत्त्वाची आहे हे विद्यार्थ्यांना सांगितले. करोना काळातील आयसोलेशनची आठवण करून दिली व त्याचा मानसिक परिणाम कसा होतो ते सांगितले.

सदर कार्यक्रमाचे स्वागत व प्रस्ताविक महाविद्यालयाच्या सूक्ष्मजीव शास्त्राच्या विभाग प्रमुख बी. के. भावीकट्टी यांनी केले. तसेच उपस्थित मान्यवरांचे स्वागत गुलाब पुष्प देऊन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समृद्धी पाटील यांनी केले. कार्यक्रमाचे आभार आरीफ मुलाणी यांनी मानले. सदर कार्यक्रमाकरिता सूक्ष्मजीवशास्त्र विभागातील सपना वेल्हाळ, प्रिया पवार, वैष्णवी पाटील यांनी परिश्रम घेतले.

# गरवारेच्या विद्यार्थिनींचे बसस्थानकामध्ये रक्षाबंधन साजरे

सांगली : हॅलो प्रभात



श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी सांगली बसस्थानकामधील चालक, वाहक, कार्यालयीन कर्मचारी, सुरक्षारक्षक यांना राखी बांधून अनोख्या पध्दतीने रक्षाबंधन साजरे केले. रक्षाबंधनाच्या सणालाही बहीणीपर्यंत पोहोचणे सेवेमुळे कठीण होते. अशा सर्व बाधवांना राखी बांधून विद्यार्थिनींनी ही उणीव भरुन काढली. विद्यार्थिनींच्या या उपक्रमाबद्दल महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळातील अधिकारी, कर्मचा-यांनी कौतुक केले. यासाठी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. अनिल सुगते, उपप्राचार्या, डॉ. नंदिनी काळे यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. तसेच या उपक्रमाच्या आयोजनासाठी डॉ. लताताई देशपांडे, स्मिता केळकर, यशश्री आपटे, गायत्री कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे आयोजन डॉ. डी. एस. देशपांडे, डॉ. व्ही. व्ही. जोशी तसेच रत्नमाला कांबळे, ऋतुजा पाटील, सुचित्रा गोलंगडे यांनी केले.

# ६२% भारतीय वडील करतात कुटुंबासाठी आर्थिक नियोजन : पीएनबी मेटलाइफ सर्व्हे

मुंबई : हॅलो प्रभात

भारतीय वडिलांपैकी जवळपास दोन तृतीयांश वडील स्वतःला 'हिरो डॅड्स' मानतात, असे पीएनबी मेटलाइफच्या नव्या सर्व्हेत दिसून आले आहे. आपल्या जीवनात वडिलांची महत्त्वाची भूमिका लक्षात घेऊन, वडील आर्थिक निर्णयप्रक्रियेत आपली भूमिका कशी पाहतात याचा देशातील अग्रगण्य जीवन विमा कंपन्यांपैकी एक असलेल्या पीएनबी मेटलाइफ इंडिया इन्शुरन्स लिमिटेडतर्फे अभ्यास करण्यात आला. या सर्व्हेमध्ये तब्बल ६२%प्रतिसादकर्त्यांनी स्वतःला 'हिरो डॅड्स', म्हणजे कुटुंबाच्या आर्थिक सुरक्षिततेचे रक्षक असे संबोधले, तर २९% वडील 'थॉटफुल डॅड्स' म्हणजे कुटुंबासाठी आर्थिक नियोजन करताना सावध, दीर्घकालीन दृष्टीकोन ठेवणारे ठरले. उर्वरित ९% वडील 'डिसिप्लिन्ड डॅड्स' म्हणजे नियमित बचत, आर्थिक शिस्त आणि काटेकोर नियोजनाला प्राधान्य देणारे दिसून आले.

# क्विक हीलकडून वापरकर्त्यांना सावध राहण्याचे आवाहन

मुंबई : हॅलो प्रभात

भारतात सणासुदीचा हंगाम सुरू होत असताना, सायबर सुरक्षा उपायांतील जागतिक आघाडीची कंपनी असलेल्या क्विक हील टेक्नॉलॉजीज लिमिटेडने सायबर घोटाळ्यांमध्ये अपेक्षित आणि धोकादायक वाढ होण्याची भीती व्यक्त केली आहे. गणेश चतुर्थी, नवरात्र, दिवाळी आणि ख्रिसमससारखे सण जवळ येत असताना लोक ऑनलाइन ट्रॅव्हल पोर्टल आणि आघाडीच्या एअरलाइन वेबसाइट्सकडे ट्रेन किंवा फ्लाइट तिकिटे बुक करण्यासाठी जात आहेत. लिंक्सवर क्लिक करणाऱ्या किंवा फसव्या यूपीआय प्रॉम्प्टला मान्यता देणाऱ्या ग्राहकांची खाती तात्काळ रिकामी होतात. छुपे मालवेअर बँकिंग क्रेडेन्शियल्स चोरतात आणि उत्सवाच्या शुभेच्छा देणारे ई-कार्ड मोबाइल ट्रोजन पोहोचवतात. संपर्क यादीमध्ये प्रवेश करत ओटीपीमध्ये अडथळा आणतात.

# सकरा हॉस्पिटल ठरले ५५० हून अधिक शस्त्रक्रिया करणारे रुग्णालय

पुणे : हॅलो प्रभात



सकरा वर्ल्ड हॉस्पिटल कर्नाटकातील पहिले असे रुग्णालय म्हणून त्याची नोंद झाली आहे ज्यांनी ५५० पेक्षा जास्त रोबोटिक हृदय शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण केल्या आहेत आणि ही कामगिरी सर्वात वेगाने गाठणारे जागतिक केंद्र ठरले आहे. ऊ तळपलळ सर्जिकल सिस्टीमच्या अधिकृत आकडेवारीनुसार ही नोंद झाली आहे. हे लक्ष्य रुग्णालयाने तीन वर्षांपेक्षा कमी कालावधीत साध्य केले असून, वर्षागणिक तब्बल ४०% वाढीचा दर नोंदवला आहे. त्यामुळे साक्रा हे 'मिनिमली इनवेसिव्ह कार्डियाक केअर' या क्षेत्रातील जागतिक नवोपक्रमाचे अग्रणी केंद्र ठरले आहे. सकरात शस्त्रक्रिया केलेले रुग्ण केवळ ३-४ दिवसांत रुग्णालयातून सुटतात आणि बहुतांश रुग्ण २-३ आठवड्यांत दैनंदिन आयुष्यात परततात.

# गौतम अदाणी यांनी 'दुसऱ्या स्वातंत्र्य संग्रामा' चे केले आवाहन

खडगपूर : वृत्तसंस्था



अदाणी समूहाचे अध्यक्ष गौतम अदाणी यांनी सोमवारी भारताला 'दुसऱ्या स्वातंत्र्य संग्रामा'ची सुरुवात करण्याचे आवाहन केले. त्यांनी सांगितले की हा संग्राम वसाहतवादी सत्ताधीशांविरुद्ध नसून परकीय तंत्रज्ञान, ऊर्जा आणि डेटा प्रणालींवर अवलंबून राहण्याविरुद्ध असेल. ते आयआयटी खडगपूरच्या हिरक जयंती समारंभात बोलत होते. गौतम अदाणी म्हणाले, भारताने जरी १९४७ मध्ये राजकीय बेड्या तोडल्या असल्या तरी २०२५ मध्येही आयात केलेल्या सेमीकंडक्टर, ऊर्जा आणि लष्करी प्रणालींवर अवलंबून राहिल्याने देश बाह्य शक्तींसमोर असुरक्षित राहतो.

नवे विचार...नवी सुरुवात
दैनिक हॅलो प्रभात

■ दैनिक हॅलो प्रभात हे पत्रक, मुद्रक शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक व मालक गणेश बंडा पाटील यांच्याकरिता, मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२ महावीरनगर, सांगली - ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक हॅलो प्रभात, कार्यालय, ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली- ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले.
■ सांगली मुख्य कार्यालय : ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली. ■ पुणे कार्यालय : १६७७, सदाशिव पेठ, अमित रेसिडेन्सी, एस.पी. कॉलेज जवळ, पुणे-४११०३०
■ सांगली शहर संपर्क : ९०२१६५१९७६ ■ कोल्हापूर कार्यालय : एस ९४६, GF-७, गुलमर्ग अपार्टमेंट, सरनाईक कॉलनी, शिवाजी पेठ, कोल्हापूर-४१६००२
■ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. (सांगली न्यायकक्षेत)

■ व्यवस्थापकीय संपादक : संजय भिडे ■ सल्लागार संपादक : संजीव शाळगावकर ■ मुख्य संपादक : गणेश पाटील-सावर्डेकर



# संमिश्र

## कोणी रस्ता करता काय...रस्ता ?



अर्जुनवाडच्या ग्रामस्थांच्यावर आली म्हणण्याची वेळ

**अर्जुनवाड : हॅलो प्रभात**

शिरोळ तालुक्यातील अर्जुनवाड मधील नवीन वसाहत येथील ग्रामस्थांना कोणी रस्ता करता काय? असे म्हणण्याची वेळ आली आहे. अनेक वर्षांपासून पावसाळ्यात चिखल, खड्ड्या तुन ग्रामस्थांना ये जा करावे लागत आहे.गावातील विविध प्रभागात रस्त्यांची अवस्था दिवसेंदिवस अधिकच खालावत चालली आहे. खड्डेमय रस्त्यांमुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. अर्जुनवाड ग्रामपंचायत प्रशासनाकडे स्थानिक नागरिकांनी वारंवार तक्रारी करण्यात आल्या असूनही कोणतीही ठोस पावले उचलली गेलेली नाहीत. श्री गणपती आगमनापूर्वी लवकरात लवकर रस्त्यांची दुरुस्ती व्हावी, अशी मागणी करत आहेत. रस्त्याच्या कामाचा प्रश्न मार्गी लागलेला नाही. परिणामी ग्रामस्थांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.दरवेळी आश्वासने मिळतात पण प्रत्यक्षात रस्ता मात्र होत नाही. आता तरी प्रशासनाने दखल घेऊन तातडीने रस्त्याचे काम करावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

## सेक्रेटरी हे रोजगाराचे उत्तम क्षेत्र : कौस्तुभ गावडे



**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

कंपनी सेक्रेटरी हे वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांसाठी रोजगाराचे उत्तम क्षेत्र असून सीए, बँकिंग किंवा स्पर्धा परीक्षा यांबरोबरच हा आशादायी पर्याय आहे, असे प्रतिपादन श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी केले.विवेकानंद कॉलेजमध्ये आय. क्यू.ए.सी., वाणिज्य विभाग व करिअर काउन्सिलिंग सेल आयोजित कार्यक्रमात सी.एस. जयदीप पाटील यांनी सीएस अभ्यासक्रम व जबाबदाऱ्यांबाबत मार्गदर्शन केले.यावेळी प्राचार्य डॉ.आर.आर.कुंभार, डॉ.मोहिते, डॉ.माने, डॉ.दबडे, आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. श्रुती जोशी, प्रा. शिल्पा भोसले तसेच प्राध्यापक, विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

## प्राथमिक विद्या मंदिर शाळेत ध्वजारोहण संपन्न



**पेठ वडगाव : हॅलो प्रभात**

प्राथमिक विद्या मंदिर, मिणचे शाळेत स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी सामाजिक कार्यकर्ते दाविद घाटगे यांच्या हस्ते ध्वज पूजन करण्यात आले. सुजित वायदंडे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवण्यात आला व शालेय य व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष युवा नेते कुमार घाटगे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. सामाजिक कार्यकर्ते भगवान घाटगे यांच्या हस्ते आजादी का अमृत महोत्सव असणाऱ्या कट्ट्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी उपस्थित शालेय व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष मोहन जाधव, मिणचे गावचे पोलिस पाटील संदीप घाटगे, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष सचिन नलवडे, शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य विनोद घाटगे, ग्राम पंचायत सदस्य सलिम जमादार, मिणचे गावच्या लोकप्रिय सरपंच सौ.सविता वाकसे, माजी सरपंच सौ.रंजना जाधव, सामाजिक कार्यकर्ते अशोक जाधव, सागर भोसले शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.सुवर्णा चव्हाण यांच्यासह शाळेचे सर्व शिक्षक वृंद विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

## क्रीडा दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन

**सांगली : हॅलो प्रभात**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, सांगली यांच्यावतीने दि. २९ ऑगस्ट रोजी हॉकीचे जादूगार मे. ध्यानचंद यांच्या १२० वी जयंती निमित्त २९ ऑगस्ट राष्ट्रीय कीडा दिन, सांगली हायस्कूल, सांगली येथे साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याचे जिल्हा क्रीडा अधिकारी किरण बोरवडेकर यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे कळविले आहे.यानिमित्त रॅलीचे आयोजन करण्यात आले असून कॉलेज कॉर्नर सांगली ते सांगली हायस्कूल सांगली असा रॅलीचा मार्ग असणार आहे. यामध्ये विविध खेळांची प्रात्यक्षिके, मर्दानी खेळ सादर केले जाणार आहेत.

# स्वप्ने साकार करण्यासाठी विद्यार्थ्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी : धनंजय चोपडे

**म्हसवड : लुनेश विरकर**

आई- वडिलांचे स्वप्न साकार करण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांनी आयुष्यात मोठी स्वप्ने पहावीत परंतु झोपेत पाहिलेली स्वप्ने कधीच पूर्ण होत नाहीत.जी स्वप्ने तुमची झोप उडवतात तीच स्वप्ने सत्यात उतरतात.त्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी असे मत सातारा जिल्हा परिषद माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी धनंजय चोपडे यांनी व्यक्त केले.ते संस्थेच्या श्री जानुबाई विद्यालय विरळी,ता.माण येथील विद्यालयात आयोजित केलेल्या गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा समारंभात मार्गदर्शनपर बोलत होते.शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये संस्थेच्या विविध शाखा मधील इयत्ता ५ वी शिष्यवृत्ती, नवोदय, इयत्ता ८ वी शिष्यवृत्ती,एन.एम.एम. एस स्पर्धा परीक्षा व इयत्ता १० वी,१२ वी मधील विद्यार्थ्यांनी बोर्ड परीक्षेमध्ये उत्तुंग यश प्राप्त केल्याबद्दल संस्थेच्या मार्फत भव्य गुणगौरव समारंभ विद्यालयाच्या सांस्कृतिक भवनात नुकताच संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन आर. एस.चोपडे होते. यावेळी संस्थेच्या व्हा.चेअरमन श्रीमती एल.टी.शेंडगे,कार्यवाह बी.पी. सरगर,सहकार्यवाह प्रशांत

### गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा उत्साहात संपन्न.



स्वामी, माजी सरपंच प्रशांत गोरड, युवा उद्योजक भरत कणसे, संचालक अशोक पडळकर,प्रविण स्वामी,लुनेश विरकर,उत्तम नलवडे, तुकाराम गोल्ड आदीसह सर्व शाखांचे मुख्याध्यापक,विरळी व चिलारवाडी गावचे आजी माजी सरपंच, उपसरपंच, सदस्य, सोसायटीचे चेअरमन, पोलीस पाटील व पंचक्रोशीतील सर्व संस्थाचे पदाधिकारी, प्रतिष्ठीत नागरिक व गुणवंत विद्यार्थी -पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुढे बोलताना माध्यमिक शिक्षणाधिकारी चोपडे साहेब म्हणाले की, विद्यार्थ्यांना केवळ परिक्षार्थी न बनविता त्यांच्यातील उपजत गुणांचा विकास करून त्याला व्यावहारिक जीवनात कुशल बनवा.आजचा विद्यार्थी उद्याचा आदर्श नागरिक बनण्यासाठी त्यांच्यामध्ये नम्रता,आई-वडील व गुरुजंना बद्दल आदर, प्रामाणिकपणा, कृतज्ञता, जिद्द, चिकाटी व अपार कष्ट करण्याची वृत्ती इत्यादी मूल्ये रुजविण्यासाठी शिक्षक बंधू भगिनींनी प्रामाणिक प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे आवर्जून नमूद केले. अध्यक्षीय भाषणात चेअरमन प्रा.चोपडे म्हणाले की, ग्रामीण भागातील लोकांच्या पाचवीलाच पूजलेल्या दुष्काळावर मात करण्याचे सामर्थ्य फक्त शिक्षणातच आहे.या सर्व गोष्टींसाठी विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी अहिल्या शिक्षण संस्था कायम कटीबद्ध असून ग्रामीण भागातील अज्ञान, अंधश्रद्धा, गरिबी, व्यसनाधीनता दूर करणे हेच अहिल्या शिक्षण संस्थेचे अंतिम ध्येय असल्याचे प्रा.आर.एस.चोपडे यांनी शेवटी आवर्जून सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक प्रशांत स्वामी यांनी केले.सूत्रसंचालन सौ.एस.एस.नलवडे व सौ. व्ही.यू.नलवडे यांनी केले तर आभार संचालक यु.सी.नलवडे मानले.

# अच्युत गोडबोले यांच्या व्याख्यानास विटेकरांचा उस्फुर्त प्रतिसाद

**विटा : हॅलो प्रभात**

रोटरी क्लब फ विटा सिटीच्या वतीने सुप्रसिद्ध संगणक तंत्रज्ञान तज्ञ व लेखक अच्युत गोडबोले यांचे ख ची जादु व आपले भविष्य या विषयावरच्या व्याख्यानास प्रंचड प्रतिसाद मिळाला.भर पावसातदेखील विटेकर नागरिकांनी हॉल खचाखच भरलेला होता. अनेकांना जागेअभावी उभा राहुन व्याख्यान एकावे लागले तर अनेकांना निराश होऊन परत जावे लागले.सुरुवातीला राष्ट्रगीत व दिपप्रज्वलानंतर विटा रोटरीचे विद्यमान अध्यक्ष सचिन आब्दर यांनी स्वागत प्रास्तावीक केले.त्यामध्ये त्यांनी विटा रोटरीच्या गेल्या १७ वर्षांच्या सामाजीक योगदानाचा आढावा घेतला.यावेळी कार्यक्रमाचे प्रायोजकत्व स्विकारलेल्या श्रीराम फायनान्स, टाटा टिस्कॅन व कालीका स्टील



च्या प्रतिनिधींचा अच्युत गोडबोले यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

अच्युत गोडबोले सरांनी संगणक तंत्रज्ञानामध्ये गेल्या काही वर्षांत आलेल्या एआय अर्थात आर्टिफिशीयल इंटीलीजन्सच्या प्रगतीमुळे मानवी दैनंदिन जिवनातील संदर्भच बदलुन गेल्याचे सांगितले.एआय व संगणक भाषांतील प्रोग्रॅम कसे लिहले जातात, कृत्रीम बुद्धिमत्ता अर्थात मशिन्सची बुद्धिमत्ता कशी वाढवीली जाते, निर्जीव मशिन्सना कसे शिकवीले जाते व हे शिकवीलेले प्रोग्रॅम्स पुन्हा मानवाच्या विविध व्यवसाय व दैनदीन कामकाजात कसे उपयोगात आणले जातात या विषयी अत्यंत सोप्या भाषेत त्यांनी समजाऊन दिले.या तंत्रज्ञानाचे अनेक फायदे असले तरी डीप फेकसारख्या तंत्रज्ञानाच्या गैरवापरानेही अनेक गंभीर प्रकाराना आपणास सामोरे जावे लागु शकते. कोडॅक, नोकियासारख्या बलाढ्य कंपण्या केवळ नविन तंत्रज्ञान न स्विकारण्याने बंद झाल्या हे सतत लक्षात घेतले पाहीजे. हे सर्व असले तरी मानसाची गरज ही मध्यवर्ती राहील,कामांचे स्वरूप बदलेल याची आपण सर्वांनी तयारी ठेवावी असे आवाहन त्यांनी केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विटा रोटरीचे अध्यक्ष सचिन अब्दर,सचिव सागर म्हेत्रे, संस्थापक अध्यक्ष किरण तारळेकर,प्रविण दाते, नितीन पुणेकर,डॉ. राम नलवडे, अनिल देशमुखे,रमेश लोटके, विक्रम राणावत,कुलदीप बाबर, अमृतराव निंबाळकर,सचिन भंडारे, कांतीलाल जोगड, डॉ.अविनाश लोखंडे, डॉ. नरेन म्हेत्रे,रोहीत दिवटे, डॉ. प्रताप वलेकर, संजय भस्मे, संतोष तारळकर, मन्सुर पटेल,दिलीप चव्हाण, स्वरुप पुणेकर, पराग महाजन व सुनिल शेट्टी या सदस्यांनी योगदान दिले.

## उचगावमध्ये न थांबणारी रंकाळा-हुपरी एसटी शिवसैनिकांनी थांबवली

**गांधीनगर : हॅलो प्रभात**

उचगाव व गडमुडशिंगी थांबा न घेणारी रंकाळा-हुपरी एसटी बस उबाठाच्या वतीने उचगाव येथे थांबवून त्यामध्ये विद्यार्थ्यांना बसवले. रंकाळा-हुपरी एसटी बस उचगाव व गडमुडशिंगी येथील बसथांब्यावर थांबत नव्हती. उचगाव व परिसरातील शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थि तसेच प्रवाशाना तासनतास येथे ताटकळत उभे राहावे लागत असे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असे. करवीर तालुकाप्रमुख राजू यादव यांच्या निदर्शनास ही बाब आल्यानंतर त्यांनी उचगाव बसथांब्यावर रंकाळा-हुपरी एसटीला थांबवून तिथेच थांबलेल्या शालेय विद्यार्थी व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना बसमधे बसविले. विद्यार्थ्यांनी यावेळी एकच जल्लोष केला.

### अन्यथा आंदोलन

एसटी महामंडळाने उचगाव व गडमुडशिंगी येथे विद्यार्थ्यांच्या हितासाठी बस थांबवावी. महामंडळाने याबाबत उपाययोजना करावी. तसे न झाल्यास एस टी महामंडळाच्या निषेधार्थ तीव्र आंदोलन करावे लागेल.

**- राजू यादव**

## विशाल चौगुले यांच्याकडून शाळेला टीव्ही संच भेट



**पन्हाळा : हॅलो प्रभात**

पोर्ले तर्फ ठाणे येथील सौ.कोमल व विशाल चौगुले यांचे कडून कुमार व कन्या विद्या मंदिर शाळेतील मुलांना डिजिटल शिक्षणाचा लाभ घेता यावा मुलांना शिक्षणाची आवड निर्माण व्हावी बुद्धिमत्तेत वाढ व शैक्षणिक प्रगती व्हावी म्हणून शाळेला स्मार्ट एलईडी टीव्ही संच भेट दिला. पालकांच्या प्रती विद्यार्थ्यांमध्ये आदर असावा म्हणून शाळेमध्ये पालकाचे पदस्पर्श पूजन कार्यक्रम आयोजित केला होता. शाळेमध्ये विद्यार्थ्यांना शुद्ध पाणी पिण्यास मिळावे म्हणून मुख्याध्यापिका यांनी आव्हान केल्यानंतर पालक वर्गातून वर्गणी जमा करून शुद्ध पाण्याचा संच बसविण्यात आला. या संचाला सुरक्षितता असावी म्हणून एचपी गॅस चे राजेंद्र तासे यांनी लोखंडी ग्रील करून दिले. या संचाचा शुभारंभ उपसरपंच सचिन चोपडे, ग्रामपंचायत सदस्य शहाजी खुडे, अरुण पाटील, संभाजी जमदाडे, शालेय नियोजन समितीचे सदस्य धोंडीराम चेचर, विकास खुडे, दीपक चौगुले, विशाल चौगुले, सचिन उदाळे, मुख्याध्यापिका व शिक्षक शिक्षिका तसेच पालक वर्ग उपस्थित होता.

# राहुल आवाडे युवा सेनेची दहीहंडी 'जय महाराष्ट्र'ने फोडली

**इचलकरंजी : हॅलो प्रभात**

सतत पडणारा पाऊस तरीही जमलेली प्रचंड गर्दी, रॉक बँडच्या तालावर थिरकणारी तरुणाई आणि पावसातही ओसंडून वाहणारा उत्साह अशा वातावरणात पश्चिम महाराष्ट्रातील सर्वात मोठी दहीहंडी अशी ओळख निर्माण झालेल्या राहुल आवाडे युवा सेनेची ३ लाख ११ हजाराची दहीहंडी शिरोळच्या जय महाराष्ट्र पथकाने फोडली. यावेळी अत्याधुनिक विद्युत रोषणाई, भव्य स्क्रीन, चित्ताकर्षक आतषबाजी आणि आकर्षणाचा केंद्र ठरलेला रॉक बॅन्ड शो आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरले. राहुल आवाडे युवा सेना यांच्या वतीने सोमवारी स्टेशन रोडवरील केएटीपी च्या मैदानात हा दहीहंडी फोडण्याचा सोहळा संपन्न झाला. विजेत्या गोविंदा पथकास तब्बल ३.११ लाख रुपयांचे बक्षिस देण्यात आले. स्पर्धेचा शुभारंभ माजी वस्त्रोद्योग मंत्री प्रकाश आवाडे, माजी आमदार सुरेश हाळवणकर आणि आमदार राहुल आवाडे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याचे व श्रीकृष्ण प्रतिमेचे तसेच दहीहंडीचे पुजन करुन करण्यात आले. या स्पर्धेत कोल्हापूर जिल्ह्यातील ५ संघ सहभागी झाले होते. सुरुवातीला सहभागी गोविंदा पथकांनी ६ थर रचत सलामी दिली. त्यानंतर चिठ्ठीद्वारे क्रमांक निश्चित करत दहीहंडी फोडण्यासाठी प्रयत्न सुरु झाले.

पहिल्यांदा गोडी विहीर पथकाला संधी मिळाली. त्यामध्ये त्यांनी सहा थर रचले. त्यानंतर हंडी फोडण्यासाठी प्रयत्न सुरु होते. सुरुवातीला ४० फुटावर असलेली दहीहंडी दोन प्रयत्नानंतर ९ फुटानी खाली घेत ती ३१ फुटावर घेण्यात आली. पदाधिकारी उपस्थित होते.

# राष्ट्र उभारणीत एन.एस.एस.चे योगदान महत्त्वाचे : डॉ.पुंडलिक चौधरी

**जत : हॅलो प्रभात**

विद्यार्थ्यांमध्ये सम ाजसेवेद्वारे राष्ट्र उभारणीत सहभागी करून घेण्याच्या उद्देशाने भारत सरकारने इ.स. १९६९ मध्ये राष्ट्रीय सेवा योजनेची स्थापना केली. पर्यावरण संवर्धन, स्वच्छता, आरोग्य, कुटुंब नियोजन, आपत्तीग्रस्तांना मदत, ग्रामविकास आदी कार्यांतून स्वयंसेवकांनी मोठे योगदान दिले आहे. वृक्षारोपण, परिसर स्वच्छता, जनजागृती फेरी, ग्राहक व शेतकरी जनजागृती, अंधश्रद्धा निर्मूलन यांसारख्या उपक्रमांद्वारे एन.एस.एस. ने सरकारचे उद्दिष्ट यशस्वीरीत्या पूर्ण केले आहे. विशेष श्रम संस्कार शिबिरांतून ग्रामस्वच्छता, मतदार नोंदणी, कुटुंब नियोजन यांसारख्या विषयांवर ग्रामीण भागात व्यापक जनजागृती केली



जाते, असे प्रतिपादन डॉ. पुंडलिक चौधरी यांनी केले.

राजे रामराव महाविद्यालय, जत येथे आयोजित विद्यार्थी उद्बोधन वर्गात राष्ट्र उभारणीत राष्ट्रीय सेवा योजनेचे योगदान या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून डॉ. पुंडलिक चौधरी यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. धनंजय वाघमोडे यांनी केले तर आभारप्रदर्शन डॉ. सतीशकुम ार पडोळकर यांनी मानले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## ग्रामपंचायत पालकरवाडी ता.राधानगरी,जि.कोल्हापूर

### जाहीर निविदा सूचना क्र. १ सन २०२५/२०२६

**ग्रामपंचायत पालकरवाडी ता.राधानगरी कडील खालील कामांची निविदा जिल्हा परिषद कडील योग्यत्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून बंद लखोटा पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहेत.**

| अ. क्र. | कामाचे नांव | योजना | अंदाजपत्रकीय रक्कम | बयाना रक्कम रु १% टक्का | निविदा फी | कामाची मुदत | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | Water ATM बसवणे (250 LPH) | १५ वा वित्त आयोग सन २०२४/२०२५ व पाणी पुरवठा निधी | ३०००००/- | ३०००/- | ३००/- | ३ महिने | - |
| २. | अंगणवाडी करिता पिण्याच्या पाण्याची सोय करणे. (अंगणवाडी क्रमांक ५७) | १५ वा वित्त आयोग सन २०२२/२०२३ | ३०४७७/- | ३०४/- | १००/- | ३ महिने | - |
| ३. | १ किलो वॅट सोलर नेट मीटरिंग (ग्रा.पं.ऑफिस) | १५ वा वित्त आयोग सन २०२३/२०२४ | ११३२२६/- | - | - | २ महिने | GEM पोर्टल पद्धती |
| ४. | महिलांना प्रशिक्षण देणे. | १५ वा वित्त आयोग सन २०२४/२०२५ | २५०००/- | - | - | २ महिने | GEM पोर्टल पद्धती |
| ५. | संगणक खरेदी (ग्रा.पं ऑफिस) | १५ वा वित्त आयोग सन २०२३/२०२४ व २०२४/२०२५ | ७९६६७/- | - | - | २ महिने | GEM पोर्टल पद्धती |

**नियम व अटी**

१) निविदा बंद लिफाफ्यातून देणेचे आहेत.
२) सदरचे काम दिलेल्या कालावधीत पुर्ण करावे.
३) सदरचे काम अंदाजपत्रकाप्रमाणे संबंधीत शाखा अभियंत्याच्या मार्गदर्शनाखाली करणेत येईल.
४) कामाच्या मुल्यांकनाप्रमाणे बिले अदा केली जातील.
५) कामाच्या बिलातून सर्व शासकीय वजाबाकी करणेत येईल.
६) काम मुदतीत पुर्ण न झालेस मक्ता रद्द करणेत येईल.
७) निविदा कोणात्याही कारणाशिवाय मंजूर अगर नामंजूर करण्याचा अधिकार ग्रा.प. चा राहील.
८) दि. २१.०८.२०२५ ते दि. ०१.०९.२०२५ अखेर सायंकाळी ५.०० पर्यन्त ग्रा.प. कार्यालयात आणून द्याव्यात.
९) सदर निविदा दि. ०३.०९.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता ग्रा.प. कार्यालयात उघडण्यात येतील.

सही/-
ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत पालकरवाडी
ता.राधानगरी, जि.कोल्हापूर

सही/-
सरपंच
ग्रामपंचायत पालकरवाडी
ता.राधानगरी, जि.कोल्हापूर

# तरुणांनी तासगावचा वैभवशाली इतिहास व परंपरा अभ्यासावी : राजेंद्र पटवर्धन

**तासगाव : हॅलो प्रभात**

मराठी साम्राज्याचा गौरवशाली इतिहास युवकांनी समजून घ्यावा. तरुणांनी तासगावचा वैभवशाली इतिहास व परंपरा अभ्यासावी असे उद्गार परशुराम भाऊ पटवर्धन यांचे वंशज व श्री गणपती पंचायतन तासगाव चे विश्वस्त राजेंद्र पटवर्धन यांनी पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील महाविद्यालय,तासगाव येथे इतिहास विभाग अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष आणि श्री गणपती पंचायतन तासगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या 'तासगावचा वैभवशाली



इतिहास' या विषयावरील व्याख्यानाप्रसंगी बोलताना काढले.त्यांनी महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज ते परशुराम भाऊ पटवर्धन असा जाज्वल्य इतिहासाचा आढावा घेतला.परशुराम भाऊंनी केलेल्या लढायात तासगावच्या इतिहासातील सोनेरी पाने आहेत. ती पाने प्रत्येक विद्यार्थ्यांनी वाचली पाहिजेत.असे आवाहन विद्यार्थ्यांना केले.तसेच तासगावचे ऐतिहासिक,भौगोलिक, आर्थिक महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले.तसेच परशुराम भाऊ पटवर्धन यांच्या पराक्रमाबद्दल सांगत असताना परशुराम भाऊंचा प्रेमळपणा व गणपतीची भक्ती याविषयी माहिती देवून गणपती मंदिराच्या स्थापनेपासून गणपती मंदिर बांधत असताना कोणकोणत्या गोष्टींची काळजी घेतली गेली आणि गणपती मंदिरावर कोणत्या शैलीचा प्रभाव आहे.याचा ओघवत्या शैलीत आढावा घेवून रथोत्सवाला सर्वांनी येण्याचे आवाहन केले.

अध्यक्षस्थानावरून बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मिलिंद हुजरे यांनी विद्यार्थ्यांना इतिहासाबद्दलची जाणीव करून देली.भविष्यामध्ये जर काही गोष्टी चांगल्या करायच्या असतील तर आपण इतिहासामध्ये डोकावून पाहिलं पाहिजे असे सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक इतिहास विभाग प्रमुख प्रा.पल्लवी मिरजकर यांनी केले तर आभार प्रा.रणजीत कुंभार यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.आण्णासाहेब बागल यांनी केले.

कार्यक्रमाला उपप्राचार्य जे.ए.यादव,ज्युनियर विभाग प्रमुख एस.डी.पाटील,श्री गणपती पंचायतन तासगाव चे दिवाणजी पवन कुडमल,मुख्य पुजारी अथर्व जोशी,समीर यादव,राजेंद्र पाटील,महाविद्यालयातील सर्व विभागाचे विभाग प्रमुख, प्राध्यापक महाविद्यालयातील, प्रशासकीय कर्मचारी,विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## येळावीत महादेव मंदिरात महाप्रसादाचे वाटप

**येळावी : हॅलो प्रभात**

येथे श्रावण मासानिमित्त श्री महादेव मंदिरात आयोजित महाप्रसादाचा सोमवारी हजारो भाविकांनी लाभ घेतला. सायंकाळी ५ नंतर महाप्रसादाला प्रारंभ करण्यात आला. दरवर्षी येथे श्रावण मासानिमित्त महाप्रसादाचे आयोजन केले जाते. श्री महादेव मंदिर हे पुरातन मंदिर असून एक जागृत देवस्थान म्हणून प्रसिद्ध आहे. मंदिर कमिटीच्या वतीने परिसरामध्ये विद्युत रोषणाई तसेच मंदिर फुलांनी सजवण्यात आले होते.मंदिरात दर सोमवारी भाविकांची गर्दी असते.



तसेच दरवर्षी हजारो भाविकांची महाप्रसादाला उपस्थिती असते. पाऊस सुरू असताना ही भाविकांनी महाप्रसाद लाभ घेतला. मंदिर परिसरात रात्री उशिरापर्यंत महाप्रसाद सुरू होता.मोठा पाऊस सुरू असल्याने मंदिर कमिटीने पावसाळी छत घालून टेबल खुर्चीवर प्रसाद घेण्याची व्यवस्था केली होती. सदर परिसरातील युवक वर्ग प्रसाद वाढण्यासाठी मोठ्या प्रमाणात होता.मंदिरसेवा कमिटीने महाप्रसाद घेण्यासाठी योग्य नियोजन राबविल्यामुळे भाविकांतून समाधान व्यक्त करण्यात आले.

## घुंगुर रस्त्यावरील दगड हटविण्याची मागणी

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

सावरेवाडी ते घुंगुर दरम्यान येणाऱ्या पहिल्या वळणावर साईड पट्ट्यांवर टाकलेले दगड हटविण्याची मागणी रस्ते सुरक्षा अभियान कोल्हापूरचे अध्यक्ष डॉ.अभिजीत जाधव यांनी संबंधित विभाग आणि प्रशासनाकडे केलेली आहे.



राक्षी फाटा ते घुंगुर या मुख्य रस्त्यावरील वाहतूक वाढलेली आहे. घुंगुर,नांदगाव ,नांदरी,सोनुर्ले आदी भागातील नागरिक बांबवडे ला जाण्यासाठी खोतवाडी फाटा मार्गे पिशवी गावातून बांबवडे मलकापूर बाजूला जात असतात. घुंगुर ते सावरेवाडी दरम्यानच्या रस्त्यावर सावरेवाडी जवळील वळणावरती रस्त्याच्या कडेला शेतामधील दगड टाकलेले आहेत,तसेच दुसऱ्या बाजूच्या साईड पट्ट्याही खचलेल्या आहेत त्यामुळे रस्ता अरुंद झालेला आहे.वळणावरती अचानक वाहन समोरून आल्यामुळे वाहन चालकांना अपघाताचा सामना करावा लागत आहे या रस्त्यावरील दगडांमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन अपघात होण्याची शक्यता असून यामध्ये जीवित हानी होऊ शकते याची गंभीरता लक्षात घेऊन रस्ते सुरक्षा अभियान कोल्हापूरचे अध्यक्ष डॉ. अभिजीत जाधव यांनी या मुख्य रस्त्यावरील दगड हटविणे तसेच बाजू पट्ट्या मजबूत करून रस्ता रुंद करण्याची मागणी संबंधित विभागाने प्रशासनाकडे केलेली आहे.

## ना.जयकुमार गोरेंच्या हस्ते सातपुते क्लिनिकचे उद्घाटन

**म्हसवड : हॅलो प्रभात**

ग्रामविकास व पंचायतराज मंत्री ना. जयकुमार गोरे यांनी म्हसवड तालुका माण येथे डॉ.चेतन सातपुते, डॉ.सौ.काजल सातपुते यांच्या ड्ढसातपुते क्लिनिकचे उद्घाटन करून आरोग्य क्षेत्रात उत्तम सेवा देऊन नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी सातपुते कुटुंबीयांना पुढील यशस्वी उज्ज्वल कारकिर्दीसाठी शुभेच्छा दिल्या.

उद्घाटन सोहळ्यात सातपुते कुटुंबीयांना शुभेच्छा देताना ग्रामविकास मंत्री नामदार जयकुमार गोरे यांनी म्हसवड मध्ये दर्जेदार आरोग्यसेवेची आवश्यकता अधोरेखित केली. आजच्या जीवनशैलीत जनतेच्या आरोग्याच्या समस्या आहेत. ग्रामीण व शहरी भागातील लोकांना तातडीने उपचाराची



गरज असते. पण सुविधा अपुऱ्या असल्यामुळे यापूर्वी अनेकदा रुग्णांना पुणे किंवा सातारा, कराड यासारख्या ठिकाणी धाव घ्यावी लागत होती.रुग्णांना जवळपास दर्जेदार उपचार मिळाले पाहिजेत हेच खरे ग्रामीण भागाचे बळ आहे. ग्रामीण व शहरी भागातील लोकांना आपल्याच शहरात आधुनिक उपचार मिळावा ही काळाची गरज आहे. म्हसवडमध्ये चांगल्या प्रकारचे सुसज्ज हॉस्पिटल उभे राहत आहेत. त्यामुळे येथील आरोग्य व्यवस्था गेल्या काही वर्षात सुधारत आहे हे आपल्या सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे. सातपुते कुटुंबीयांसोबत आमचे अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध असून ते कायम सुख,दुःखात माझ्या सोबत राहिले आहेत. या क्लिनिकच्या माध्यमातून सातपुते दांपत्य सर्वसामान्य गरीब, गरजू ,नागरीकांची तपासणी,उपचार तसेच औषधे अशा वैद्यकीय सेवा देऊन वैद्यकीय क्षेत्र सक्षम करतानाच सर्वसामान्यांना गुणवत्तापूर्ण आणि किफायतशीर दरात वैद्यकीय सेवा देण्याला प्राधान्य देतील असा विश्वास ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे (भाऊ) यांनी व्यक्त करून डॉ.चेतन सातपुते व डॉ.सौ. काजल सातपुते, डॉ.योगेश सातपुते, डॉ.अभिषेक सातपुते यांना पुढील यशस्वी उज्ज्वल कारकिर्दीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी डॉ.लक्ष्मण कोडलकर,डॉ.जयवंत गलंडे, अक्षय सोनवणे, मिना बाबर-निंबाळकर, डॉ.अनिता खरात यांच्या सह विविध क्षेत्रातील मान्यवर, म्हसवड, पुळकोटी गावचे ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मराठा मोर्चासाठी कडेगाव तालुक्यात बैठका सुरू

### २२ ऑगस्ट रोजी रॅलीचे नियोजन

**कडेगाव : हॅलो प्रभात**

मराठा आरक्षणाच्या निर्णायक लढ्यासाठी संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांनी २९ ऑगस्ट रोजी मुंबईत आमरण उपोषणास बसण्याचा इशारा दिल्यानंतर राज्यभरात उत्साहाची लाट उसळली आहे. त्याला प्रतिसाद म्हणून कडेगाव तालुक्यातील गावागावात बैठका जोरात सुरू असून, मराठा समाज मोठ्या संख्येने एकत्र येत आहे. २२ ऑगस्ट रोजी दुपारी १ वाजता



शिवणी फाटा ते कडेगाव या प्रमुख मार्गावर भव्य दुचाकी रॅलीचे आयोजन करण्यात आले असून, या रॅलीसाठी युवकांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांनी जय्यद तयारी केली आहे. या रॅलीमध्ये सहभागी होण्यासाठी सर्व मराठा समाजबांधव सकाळी ११ वाजता आपाआपल्या गावातून रॅलीने निघणार आहेत व शिवणी फाटा येथे दुपारी १ पर्यंत एकत्र येणार आहेत. रॅलीमधून होणारे आवाहन हे मुंबई मोर्चाला मोठा वेग देणार आहे. नुकत्याच झालेल्या कडेगाव व देवराष्ट्रे येथील बैठकींना मराठा बांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. जरांगे पाटील यांच्या उपोषणाला आम्ही ठाम पाठीशी आहोत. आरक्षणाचा हक्क मिळवण्यासाठी मुंबई गाठूच, असा ठाम निर्धार यावेळी उपस्थित मराठा समाज बांधवांनी व्यक्त केला. राज्यभरातील मराठा समाजप्रमाणेच कडेगाव तालुक्यातील प्रत्येक गावातून मोठ्या संख्येने बांधव मुंबईकडे रवाना होण्याची तयारी सुरू आहे. २९ ऑगस्ट रोजी होणारा मराठा मोर्चा हा आरक्षणाच्या लढ्यातील नवा टप्पा ठरणार, अशी भावना व्यक्त होत आहे.

## राजे रामराव महाविद्यालयात विद्यार्थी उद्बोधन वर्गाचे उद्घाटन

**जत : हॅलो प्रभात**

राजे रामराव महाविद्यालय, जत येथे नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी व उच्च शिक्षण प्रक्रियेविषयी विद्यार्थ्यांना माहिती देण्यासाठी विद्यार्थी विकास मंडळ व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थी उद्बोधन वर्गाचे उद्घाटन प्रसिद्ध चिकित्सक डॉ. रवींद्र आरळी यांच्या हस्ते दिमाखात संपन्न झाले. कार्यक्रमाची सुरुवात संस्थेचे संकल्पक संस्थापक शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या प्रतिमा पूजनाने झाली.

प्रमुख पाहुणे डॉ. रवींद्र आरळी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की,




महाविद्यालयीन जीवन ही केवळ पुस्तकांपुरती मर्यादा नसून, व्यक्तिमत्व घडविण्याची खरी संधी असते.

विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमांत सहभाग घेऊन आपली सर्वांगीण प्रगती साधावी. विद्यार्थ्यांनी नकारात्मक विचार सोडून प्रामाणिक प्रयत्न केले तर जीवनात कधीच अपयश येणार नाही. तसेच नैतिक मूल्ये, समाजसेवा व देशप्रेम यांचा अंगीकार करण्याचे आवाहनही त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. सुरेश पाटील हे होते. यावेळी बोलताना त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून महाविद्यालयाच्या इतिहासाची, शैक्षणिक प्रगतीची व विविध उपक्रमांची माहिती विद्यार्थ्यांना दिली. त्यांनी नवागत विद्यार्थ्यांना शिस्त, कष्ट व आत्मविश्वास यांच्या बळावर यशस्वी होण्याचा संदेश दिला.

यावेळी श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे आजीव सदस्य श्री. कृष्णा बिसले, सेवानिवृत प्रा. चंद्रसेन मानेपाटील, प्रा.श्रीमंत ठोंबरे हे मंचावर उपस्थित होते.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. अरविंद पवार यांनी, सूत्रसंचालन प्रा. धनंजय वाघमोडे यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. सतीशकुमार पडोळकर यांनी मानले.

## भडकंबेच्या विकासासाठी आग्रही भूमिका घेऊ : राहुल महाडिक

### विविध विकास कामांचे उद्घाटन



**पेठ : हॅलो प्रभात**

भडकंबे गावच्या विकास कामांसाठी पुढाकार घेत असताना गावच्या सर्वांगीण विकासासाठी नेहमीच प्रयत्नशील राहणार आहे.असे प्रतिपादन सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक मा.राहुल महाडीक यांनी केले.ते भडकंबे (ता. वाळवा) येथील जनसुविधा व नागरी सुविधा विकास योजने अंतर्गत २५ लाख रुपयांच्या विविध विकास कामाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते.यावेळी युवानेते रविंद्र पाटील, नवजीवन दूध संस्थेचे अध्यक्ष मारुती पाटील,भैरवनाथ सोसायटीचे माजी अध्यक्ष बाबुराव पाटील, उपसरपंच संदीप मोरे,सदस्य नितिन बागणे यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी बोलताना मा.राहुल महाडिक म्हणाले, शासनाच्या सर्व विकासात्मक योजना राबवण्यासाठी भरीव निधीची उपलब्धता करून देणार आहे. विकासकामांसह हे गाव प्रगतीपथावर नेण्यासाठी युवकांच्या हाताला रोजगार देणार आहे.

यावेळी शुभम माळी,पंडीत लोंढे, मुकुंद जगताप,परशुराम बामणे,माजी ग्रामपंचायत सदस्य आनंदराव पाटील, तानाजी जगताप,अमोल पाटील यांच्यासह ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.

## स्वातंत्र्य दिनानिमित्त कोपेश्वर मंदिरावर विद्युत रोषणाई

**नृसिंहवाडी : हॅलो प्रभात**

'आजादी का अमृत महोत्सव' या केंद्र सरकारच्या योजनेनुसार ७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त शिरोळ तालुक्यातील 'महाराष्ट्राचे खजुराहो' म्हणून ओळखले जाणाऱ्या खिद्रापूर येथील प्राचीन कोपेश्वर मंदिरावर तिरंगा रंगाचे आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती.



ग्रामपंचायत खिद्रापूर पर्यटन प्रेमी लोकांनी आपले पर्यटन स्थळ आजादी का अमृत महोत्सव मध्ये सामील व्हावे यासाठी ७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त कोपेश्वर मंदिरावर भगव्या पांढऱ्या व हिरव्या रंगाची आकर्षक तिरंग्याप्रमाणे दिसणारी विद्युत रोषणाई केले होते. स्वातंत्र्य दिनाची सुट्टी असल्याने हे विलोभनीय दृश्य पाहण्यासाठी पर्यटकांनी मोठी गर्दी केली होती तर रात्रीच्या वेळी कृष्णा नदीत याचे आकर्षक प्रतिबिंब दिसत होते.

## महामार्गावरील अपूर्ण कामामुळे अपघाताला आमंत्रण

**पिलीव : हॅलो प्रभात**

सातारा पंढरपूर हा महामार्ग असून या मार्गावरून सातारा-पंढरपूर वाई - पंढरपूर सातारा -तुळजापूर सातारा- गाणगापूर तसेच सातारा -सोलापूर अशा अनेक महामंडळाच्या व इतर बसेस ट्रक व इतर वाहने धावत असतात. याच मार्गावरून अनेक संत, महंत, महाराज ऋषी यांचे दिंडी व पालखी सोहळे आषाढी कार्तिकीला पंढरपूरला येत जात असतात. शिवाय मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांच्या मालाची मालवाहतूक होत असते. परंतु



साळमुख-पिलीव पर्यंत तीन ते चार ठिकाणी ब्रिजचे अपूर्ण काम त्याचप्रमाणे जागोजागी खड्डे त्यामुळे पावसाळ्यात तर रस्त्यात पाणी का, पाण्यात रस्ता हे सुद्धा वाहन चालकाला समजत नाही .

अशा प्रकारे या रस्त्याची दुर्दशा झालेली आहे . या ठिकाणी अनेक दुचाकी स्वार ,चार चाकी वाहने यांच्या अपघाताचे प्रमाण केवळ अपूर्ण कामे आणि रस्त्यावरील खड्डे यामुळे वाढत चालले आहे. याबाबत अनेक वेळा वर्तमानपत्रातून त्याचप्रमाणे संबंधित ठेकेदाराला प्रत्यक्ष कल्पना देऊनही याकडे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे शेतकरी वर्ग ग्रामस्थ याबाबत संताप व्यक्त करत असून ,त्वरित सदरचे खड्डे बुजवून ब्रिजचे काम सुरू करून होणाऱ्या अपघाताला आळा संबंधित खात्याने घालावा. अन्यथा असंख्य शेतकरी, विविध संघटना, ग्रामस्थ याबाबत तीव्र रस्ता रोको अथवा अन्य मार्गाचा अवलंब करण्याच्या मनस्थितीमध्ये आहेत.

## विद्या मंदिर शाळेला आकर्षक फोटो फ्रेम भेट

**शिराळा : हॅलो प्रभात**

देणाऱ्याने देत जावे घेणाऱ्याने घेत जावे या युक्तीप्रमाणे विद्या मंदिर जोंधळेवाडी शाळेला आकर्षक फोटो फ्रेम भेट देऊन शाळेचे सौंदर्य वाढविले. शाहुवाडी तालुक्यातील जोंधळेवाडी ही जिल्हा परिषद शाळा अत्यंत दुर्गम भागातील असून या ठिकाणी शैक्षणिक सुविधांचा अभाव आहे. या शाळेची गरज ओळखून निनाई बाजार कोकरूड यांनी विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी तसेच विविध नेत्यांची ओळख व्हावी या उद्देशाने जोंधळेवाडी शाळेला नेत्यांचे फोटो भेट दिले.

शाळेला भेट देण्यासाठी



त्याच फोटोंची निवड केल्याबद्दल निनाई बझारचे सर्व शिक्षक व विद्यार्थी धन्यवाद देत आहेत. त्यांनी दिलेल्या फोटोमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या नेत्यांची ओळख अगदी एकाच फोटो फ्रेम मधून होणार आहे.

या बझारचे सहकार्य सदैव तेथील विद्यार्थ्यांना प्रेरणा देत राहील. या फोटो फ्रेमचे वैशिष्ट्य म्हणजे या एका फोटो फ्रेम मध्ये आणखी २० लॅमिनेटेड फोटो फ्रेम दडलेल्या आहेत. या भेटी प्रसंगी निनाई बझारचे कोकरूडचे व्यवस्थापक प्रदीप शेटे श्रीरंग नांगरे मोहन पाटील शामराव जोंधळे अंगणवाडी शिक्षक व शाळेतील सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

## एस.एस.जी.एम. महाविद्यालयात जनजागृती कार्यशाळा संपन्न

**कोपरगाव : हॅलो प्रभात**

श्री सद्गुरू गंगागीर महाराज सायन्स, गौतम आर्ट्स अ‍ॅण्ड संजीवनी कॉमर्स कॉलेज येथे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, आय.बी.पी.एस., करिअर कट्टा कमिटी, अंतर्गत गुणवत्ता कक्ष तसेच अहिल्यानगर येथील समाजकल्याण सहाय्यक आयुक्त कार्यालय यांच्या सयुक्त विद्यमाने आयोजित एकदिवसीय जनजागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेचे उद्घाटन बार्टीच्या समतादूत प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी दिलावर सय्यद यांच्या हस्ते झाले.

सदर प्रसंगी त्यांनी आपल्या मनोगतात, विद्यार्थ्यांनी कौशल्य विकास कार्यक्रम अंतर्गत मिळणाऱ्या १५७ मोफत प्रशिक्षणाचा तसेच आर्थिक स्वरूपात मिळणाऱ्या मदतीचा लाभ घ्यावा तसेच कौशल्य विकास कार्यक्रम अंतर्गत मिळणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली. या योजनांसाठी आवश्यक



असणाऱ्या सर्वसाधारण अटी व पात्रता निकष विद्यार्थ्यांना व उपस्थितांना समजावून सांगितले. कार्यशाळेच्या अध्यक्षीय मनोगतात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव सरोदे यांनी, महाविद्यालयाने विविध कमिटींच्या माध्यमातून आपल्या विद्यार्थ्यांना नोकरी आणि व्यवसाय मार्गदर्शन करण्याचे काम केले आहे. शासन विद्यार्थ्यांना खूप काही देते आहे ते घेण्याची विद्यार्थ्यांनी आपली मानसिकता तयार करायला हवी. विद्यार्थ्यांनी सदैव जागृत असायला हवे. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी शासनाच्या भरतीपूर्व प्रशिक्षण आणि प्रत्यक्ष विद्यावेतन यांसारख्या विविध योजनांचा लाभ घेवून जीवनात यश प्राप्त करावे. असे आवाहन केले. सदर एकदिवशीय कार्यशाळेचे स्वागत आणि पाहुण्यांचा परिचय महाविद्यालयीन स्पर्धा परीक्षा केंद्राचे चेअरमन प्रा. चेतन इंगळे यांनी केले. सदर कार्यशाळेसाठी विज्ञान विभागाचे उपप्राचार्य डॉ. घन:श्याम भगत, वाणिज्य विभागाचे उपप्राचार्य डॉ. अर्जुन भागवत, महाविद्यालयीन पोलिस भरती प्रशिक्षण केंद्राचे प्रमुख डॉ. विशाल पवार, करिअर कट्ट्याचे प्रा. किरण पवार, आय.बी.पी.एस.च्या प्रा. डॉ. सीमा दाभाडे, रेल्वे भरतीच्या डॉ.योगिता भिलारे यांसह महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. या कार्यशाळेचे सूत्रसंचालन प्रा. सुनील काकडे व प्रा. प्रतीक्षा संवत्सरकर यांनी केले. तर आभार प्रा डॉ. सीमा दाभाडे यांनी मानले.

## राहुरीत संत सेना महाराज पुण्यतिथी साजरी



**राहुरी : हॅलो प्रभात**

संतश्रेष्ठ सेना महाराज यांची पुण्यतिथि सकल नाभिक समाजाच्या वतीने मोठ्या भक्तिभावाने संपन्न करण्यात आली. सकाळी सत्यनारायण महापूजा व देवीचीमहापूजा करण्यात आली . संत सेना महाराज यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीमध्ये शहरातील आबालवृद्ध सर्व थरातील नागरिक सहभागी झाले होते. संत सेना महाराज प्रतिमेचे पूजन डॉ. बा. बा. तनपुरे कारखान्याची अध्यक्ष व राहुरी मार्केट कमिटीचे चेअरमन अरुण तनपुरे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी राहुरी नगरपालिकेचे माजी उपनगराध्यक्ष आर .आर .तनपुरे पाटील ,संभाजीराजे तनपुरे ,शिक्षण विस्ताराधिकारी कल्याण राऊत, जिल्हा उपाध्यक्ष भाऊसाहेब बिडवे, तालुकाध्यक्ष बंटी कोरडे, लक्ष्मण चौधरी, मधुकर थोरात, बाळु राऊत, प्रसाद कोरडे ,हनुमान कोरडे, प्राचार्य श्री.कोरडे उपस्थित होते. यावेळी हरिभक्त परायण शशिकांत महाराज दुधाडे यांच्या प्रवचनाचा कार्यक्रम संपन्न झाला.

## मिरवणुकांमध्ये प्लाझमा, बीम लाईट, लेझर बीम लाईटच्या वापरास प्रतिबंध

**सांगली : हॅलो प्रभात**

भारतीय नागरिक संरक्षण संहिता २०२३ चे कलम १६३ (१) अन्वये प्राप्त अधिकारानुसार जिल्हा दंडाधिकारी अशोक काकडे यांनी सांगली जिल्हा स्थलसीमा हद्दीत दि. २५ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ७ वाजल्यापासून ते दिनांक ७ सप्टेंबर २०२५ रोजीचे १२ वाजेपर्यंत सांगली जिल्ह्यातील सर्व प्रकारच्या मिरवणुकांमध्ये व्यक्ती, समुदाय, मंडळ यांच्यामार्फत प्लाझमा, बीम लाईट आणि लेझर बीम लाईटच्या वापरास प्रतिबंध केला असल्याचे आदेश निर्गमित केले आहेत.

## डोळ्यांच्या आरोग्याला प्राधान्य देणे आवश्यक

**मुंबई : हॅलो प्रभात**

वर्ल्ड सिनियर सिटिझन्स डे च्या निमित्ताने, भारतातील आघाडीचे सुपर-स्पेशालिटी डोळ्यांचे रुग्णालयांचे जाळे सेंटर फॉर साइट यांनी वृद्धावस्थेत होणाऱ्या डोळ्यांच्या आजारांवर वेळेत उपचार करण्याच्या तातडीच्या गरजेवर भर दिला आहे. जागरुकता वाढवण्यासाठी, सेंटर फॉर साइटने फिटनेस आयकॉन मिलिंद सोमण यांच्यासोबत भागीदारी केली आहे. ते सक्रिय वृद्धत्व आणि सर्वांगीण आरोग्याचे प्रतीक मानले जातात.

या मोहिमेतून कुटुंबांना स्मरण करून दिले जाते की नियमित डोळ्यांची तपासणी केल्याशिवाय आरोग्य पूर्ण होत नाही.भारतात ६० वर्षांवरील लोकांची संख्या १४ कोटींहून अधिक आहे, त्यापैकी जवळपास प्रत्येक तिघांपैकी एकाला दृष्टीदोषाचा सामना करावा लागतो. ही समस्या त्यांचा स्वावलंबन आणि जीवनमान यांना मोठ्या प्रमाणात बाधा आणते. जगभरातील ८० टक्के अंधत्वाची प्रकरणे टाळता येऊ शकतात. तरीसुद्धा, चुकीच्या समजुती आणि उशिरा घेतलेली वैद्यकीय मदत यामुळे अनेक ज्येष्ठ नागरिक आपली दृष्टी गमावतात. भारतात अंधत्वाचे प्रमुख कारण असलेला मोतीबिंदू आता आधुनिक ब्लेडलेस, रोबोटिक लेझर शस्त्रक्रियेद्वारे एका दिवसात दुरुस्त करता येतो. ग्लॉकोमा (ज्याला सायलेंट थीफ ऑफ साइट म्हटले जाते) सुरुवातीला कोणतेही लक्षण दिसत नाही आणि तो हळूहळू वाढतो. याशिवाय डायबेटिक रेटिनोपॅथी आणि इतर रेटिनाचे आजारही वाढत आहेत.

## सर्व यंत्रणांनी समन्वय ठेवावा : जिल्हाधिकारी काकडे

**सांगली : हॅलो प्रभात**

संभाव्य आपत्तीत कोणत्याही प्रकारची हानी होऊ नये यासाठी संबंधित सर्व यंत्रणांनी परस्पर समन्वय ठेवावा, अशा सूचना जिल्हाधिकारी अशोक काकडे यांनी दिल्या. शिराळा येथील तहसीलदार कार्यालयात झालेल्या पूर परिस्थितीच्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

## ‘गौरीशंकर’ च्या सुखात्मे स्कूलच्या विद्यार्थ्यांची उत्तुंग कामगिरी

**सातारा : हॅलो प्रभात**

महाराष्ट्र बुडोकॅन कराटे अँड स्पोर्ट्स असोसिएशनच्या वतीने भुईंज येथे घेण्यात आलेल्या खुल्या राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत विविध गटात गौरीशंकर च्या डॉ .पी. व्ही सुखात्मे इंग्लिश मीडियम स्कूल लिंबच्या विद्यार्थ्यांनी कराटे स्पर्धेत उत्तुंग यश मिळून स्कूलचा नांवलौकिक उंचविला आहे.

या स्पर्धेत राज्यभरातून जवळपास ८०० खेळाडूंनी सहभाग घेतला होता. यामध्ये गौरीशंकर च्या डॉ पी व्ही. सुखात्मे स्कूलच्या विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी करून विविध गटात बक्षीसे प्राप्त केली आहेत. यामध्ये मुलींच्या गटात

### स्वरा सावंत, उत्कर्ष केंजळे ठरले सुवर्णपदकाचे मानकरी




स्वरा सावंत हिने काता म्हणजेच फाईट या क्रीडा प्रकारात सुवर्णपदक तर आराध्या जाधव हिने रौपदक मिळवले. मुलांमध्ये यश भोसले यांनी काता या क्रीडा प्रकारात कास्यपदक तर शौर्य शिंदे यांनी रौप्यपदक तसेच उत्कर्ष केंजळे यांने काता क्रीडा प्रकारात कास्यपदक तर फाईट क्रीडा प्रकारात सुवर्णपदक प्राप्त केले. रंजीत पवार यांनी काता क्रीडा प्रकारात सुवर्णपदक तर फाईट क्रीडा प्रकारात रौप्य पदक मिळवले. कराटे स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा संस्थेचे प्रशासकीय अधिकारी नितीन मुडलगीकर यांच्या हस्ते या विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. यावेळी संस्थेचे जनसंपर्क अधिकारी श्रीरंग काटेकर प्रभारी प्राचार्य घनश्याम चव्हाण अमित मडके नितीन शिवथरे राकेश खोपडे आदी प्रमुख उपस्थित होते.

प्रशिक्षक ब्लॅक बेल्ट विजेते संतोष माने यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष मदनराव जगताप उपाध्यक्ष मिलिंद जगताप संचालक डॉ अनिरुद्ध जगताप जयवंतराव साळुंखे अप्पा राजगे यांनी अभिनंदन केले.

## शिवसेनेच्या बारामती मतदारसंघाच्या सोशल मीडिया प्रमुखपदी भूषण सुर्वे

**दौंड : हॅलो प्रभात**

एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना पक्षाच्या वतीने शरद पवार यांच्या बालेकिल्लातील भूषण सुर्वे यांची महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,खा.डॉ.श्रीकांत शिंदे, सचिव संजय मोरे, मंगेश चिवटे, पुणे जिल्हाप्रमुख सुरेंद्र जेवरे, शिवसेना पक्षाचे सोशल मीडिया राज्य प्रमुख राहुल कनाल, उपराज्य प्रमुख प्रतीक शर्मा व सोशल मीडिया पश्चिम महाराष्ट्र प्रमुख महादेव सलवडे यांच्या नेतृत्वाखाली बारामती लोकसभा मतदारसंघाच्या सोशल मीडिया प्रमुखपदी निवड करण्यात आली. भूषण सुर्वे हे मूळचे



इंदापूरचे असून गेल्या सात ते आठ वर्षांपासून महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे विशेष कार्य अधिकारी मंगेशजी चिवटे यांच्या माध्यमातून शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे राज्य कार्यकारणी सदस्य, पुणे जिल्हा संपर्कप्रमुख व सोशल मीडिया प्रमुख महाराष्ट्र राज्य या पदांची जबाबदारी सुर्वे यांच्या वरती असून एकनाथ शिंदे यांचे कार्य व शिवसेनेचे कार्य पुणे जिल्ह्यांमध्ये घराघरात पोहोचवण्यासाठी सुर्वे हे प्रयत्नशील असतात, त्याचप्रमाणे मुख्यमंत्री सहायता निधीमधून एकनाथ शिंदे यांच्या कार्य काळामध्ये भूषण सुर्वे यांनी पुणे जिल्ह्यामध्ये सुमारे दीड कोटींपेक्षा जास्त निधी गोरगरीब रुग्णांसाठी मंजूर करून आणला होता यामध्ये त्यांचा मोलाचा वाटा होता. सर्वसामान्य कुटुंबातून आलेल्या व्यक्तीला एकनाथ शिंदे व मंगेश चिवटे यांनी वेळोवेळी साथ दिल्यामुळे पवारांच्या बालेकिल्ले देखील एकनाथ शिंदे यांची ओळख घराघरात पोहोचवण्यात देखील सुर्वे यशस्वी झाले आहेत असे सुर्वे यांनी सांगितले.

## आ.काळे यांच्या आयत्या पीठावर रेघोट्या

### सुनील कदम; केवळ श्रेयासाठी केविलवाणा प्रयत्न

**कोपरगाव : विनोद जवरे**

कोपरगाव तालुक्यातील नागरिकांच्या सुरक्षेसाठी व सोयीसाठी माजी आमदार सौ. स्नेहलताताई कोल्हे यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळाले असून नुकतेच पोहेगाव व जवळके ही गावे शिर्डी पोलिस स्टेशनऐवजी कोपरगाव पोलिस स्टेशनच्या कार्यक्षेत्रात समाविष्ट झाली आहेत. या निर्णयामुळे तालुक्यातील जनतेच्या अनेक अडचणी दूर होऊन त्यांना तातडीने पोलिस सेवांचा लाभ मिळणार आहे.नेहमीप्रमाणे या कामासाठी देखील आमदार आशुतोष काळे यांनी श्रेय घेण्याचा केविलवाणा प्रयत्न केला आहे. भाजपा तालुकाध्यक्ष सुनील कदम यांनी आ.काळे यांच्यावर निशाणा साधत म्हटले की, कामाचा पाठपुरावा कोल्हे यांनी करायचा आणि त्याचे श्रेय घेण्यासाठी काळे यांनी आयत्या पीठावर रेघोट्या मारायच्या हा प्रकार लोकशाहीला शोभणारा नाही.मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या २०१४ ते २०१९ कार्यकाळात स्नेहलताताई कोल्हे यांनीच कोपरगावात शहर व ग्रामीण असे दोन स्वतंत्र पोलिस स्टेशन मंजूर करून घेतले होते. तत्कालीन गृहराज्यमंत्री राम शिंदे यांनीही यासाठी सहकार्य केले होते. त्यानंतर वेळोवेळी नवनिर्मित शहर पोलिस स्टेशन, कर्मचारी निवास वसाहत तसेच आवश्यक निधी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपलब्ध करून दिला. प्रारंभी शहर पोलिस स्टेशनसाठी ३ कोटी ३२ लाख रुपये निधी मंजूर झाला. त्यानंतर युती सरकार आल्यावर ग्रामीण पोलिस स्टेशन व कर्मचारी वसाहतीसाठी तब्बल २८ कोटी ५० लाखांचा निधी मंजूर करण्यात आला.काम कोल्हे यांनी केले आणि अनेक इमारतीचे उद्घाटन काळे यांनी कवडीचा संबंध नसताना केले होते हे संपूर्ण मतदारसंघाने पाहिलेले आहे. तालुक्याच्या भौगोलिक विस्तारामुळे पोहेगाव व परिसरातील गावे शिर्डी पोलिस स्टेशनला जोडली गेली होती. मात्र नागरिकांचा दैनंदिन कामांसाठी देखील होणारा प्रचंड त्रास ओळखून स्नेहलताताई कोल्हे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे या गावांना पुन्हा कोपरगाव पोलिस स्टेशनला जोडावे अशी मागणी केली होती. त्याचा परिणाम म्हणून नुकत्याच गृहविभागाकडून मंजुरी कोल्हे यांच्या मागणीनुसार मिळाली आहे. कोल्हे यांनी केलेल्या मागणीनुसार कार्यवाही करावी असे स्पष्ट निर्देश गृहविभागाने दिलेले होते यामुळे काळे यांनी उगाच नको त्या कामाचे श्रेय घेऊ नये. हा निर्णय स्नेहलताताई कोल्हे यांच्या दूरदृष्टीचा आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांचा परिणाम आहे, हे स्पष्ट होते.त्यामुळे आमदार काळे यांनी श्रेय घेण्याचा प्रयत्न करू नये, अशी टीका कदम यांनी केली आहे.

## सामनगाव - लोळेगाव रस्ता झाला चिखलमय ; विद्यार्थी व नागरिकांचे हाल

**शेवगाव : हॅलो प्रभात**

शेवगाव तालुक्यातील सामनगाव ते लोळेगाव रस्ता पावसाने चिखलमय झाला असून या रस्त्यावरून दररोज प्रवास करणाऱ्या नागरिक व शाळकरी विद्यार्थ्यांचे जीवित्व धोक्यात आले आहे. त्यामुळे या रस्त्यावर तात्काळ उपाययोजना कराव्या,अशी मागणी आता नागरिकांकडून होत आहे.मतदार संघाच्या शेवगाव शहरापासून अवघ्या काही अंतरावर असलेल्या लोळेगाव ते सामनगाव हा २ किमी , लोळेगाव-जोहरापूर ३ किमी हा रस्ता किलोमीटर लांबीचा आहे.मात्र आता पावसामुळे या रस्त्यावर चिखल होऊन दयनीय अवस्था झाली आहे.

यंकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याने या रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या नागरिक व शाळकरी विद्यार्थ्यांच्या जीवित्वाला धोका निर्माण



झाला आहे.सध्या पावसाळा सुरु झाला असून या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात चिखलाचे साम्राज्य असून रस्त्यावर मोठ मोठे खड्डे पडले आहे. या रस्त्यावरून प्रवास करताना वाहन चालकांना मोठी कसरत करावी लागत आहे.चिखलामुळे वाहन घसरत आहे.

या प्रकारामुळे या रस्त्यावर प्रवास करणारे नागरिक व विद्यार्थी संतप्त झाले आहे. नागरिकांना प्रसूती अपघात या सारख्या आपत्कालीन रुग्णांना दवाखान्यात नेण्यात अडचण होत आहे.या रस्त्याविषयी अनेक वेळा प्रशासनाला पाठपुरावा करण्यात आला.मात्र या रस्त्याची समस्या निकाली काढण्यात प्रशासनाने कोणतीच कार्यवाही केली नाही.शासन ग्रामीण भागातील नागरिकांना मोजता ही न येणाऱ्या संख्ये एवढे रुपये खर्च करून महामार्ग निर्माण करण्यात व्यस्त आहे.मात्र ग्रामीण भागातील रस्त्याकडे शासनाचे दुर्लक्ष का? ग्रामीण भागातील नागरिकांना मतदान करण्यापुरतेच महत्व का? नको आम्हाला महामार्ग आम्हाला फक्त हा रस्ता करून द्यावा,

अशा संतप्त भावना आता या लोळेगाव भागातील नागरिकांकडून व्यक्त होत आहे.प्रशासनाने जर वेळीच कोणतीच कार्यवाही केली नाही तर शेवगाव अहिल्यानगर महामार्गावर मोठ्या संख्येने शाळकरी मुलांना घेऊन आंदोलन सुरु करू असा इशारा ग्रामस्थांनी केले आहे.

## गोदामाई प्रतिष्ठाणचे कोपरगाव नगर परीषदेला पत्र



### मंदिराकरीता जागा उपलब्ध करुन देण्याची मागणी

**कोपरगाव : हॅलो प्रभात**

गोदावरी नदीच्या कडेला बेट भागात गोदावरी मातेचे मदिराकरीता जागा उपलब्ध करुन द्यावी अशी मागणी गोदामाई प्रतिष्ठाण ट्रस्टचे अध्यक्ष आजिनाथ ढाकणे यांनी कोपरगाव नगरपरीषदेकडे केली आहे.कोपरगाव नगरपरीषदेचे मुख्याधिकारी यांना दिलेल्या पत्रात ढाकणे यांनी म्हंटले आहे, कोपरगाव शहरातुन गोदावरी नदी ही पुर्व दक्षिण व पूर्व उत्तर पश्चिम वाहीनी झालेली आहे. तसेच कोपरगावास फार मोठा पौराणिक इतिहास आहे. कोपरगाव बेट भागात जगातील एकमेव दैत्यगुरु शुक्राचार्य मंदिर, संजीवन मंत्र पार, कचेश्वर व त्र्यबंकेश्वर मंदिर, प. पू. जनार्दन स्वामी महाराज, प. पू. रामदासीबाबा यांचे समाधी स्थळ आहे. शहरातील खंडोबा मदिराकरीता श्री. साईबाबा यांनी तपस्या केलेली तपोभूमी आहे. त्यामुळे २०२७ मध्ये येणाऱ्या कुंभमेळयाचे वेळी याठिकाणी देखील भाविकांची मोठी गर्दी असते. त्यामुळे गोदावरी नदीच्या कडेला बेट भागात गोदावरी मातेचे मदिराकरीता जागा उपलब्ध करुन द्यावी.मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, आ.आशुतोष काळे, नाशिक विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व तहसिलदार कोपरगाव यांनाही या निवेदनाच्या प्रति पाठविण्यात आल्या आहेत.

## एसटी वेळेवर येत नसल्याने विद्यार्थ्यांचे हाल

**दौंड : हॅलो प्रभात**

दररोज शाळा, कॉलेज सुटल्यानंतर तासनतास बस वाट पाहावी लागत असल्याने विद्यार्थी व विद्यार्थिनी घरी वेळेवर पोहचत नसल्याने पालकांच्या जीवाला घोर लागला आहे. दौंड तालुक्यातील पाटस, कुसेगाव, कानगाव, हिंगणीगाडा, रोटी इत्यादी ठिकाणांहून पाचशे ते सहाशे विद्यार्थी व विद्यार्थिनी वरवंड याठिकाणी येत असतात. परंतु शाळा सुटल्यानंतर घरी जाण्यासाठी वेळेवर बस नसल्याने बस स्थानकावर तासनतास बसची वाट पाहत थांबावे लागत आहे. बस वेळेवर येत नसल्याने घरी जाण्यासाठी विद्यार्थ्यांना उशीर होत आहे. त्यामुळे पालकांच्या जिवाला घोर लागत आहे. या गावातील काही पालकांनी एसटी आगार प्रमुख यांची भेट घेऊन विद्यार्थ्यांची समस्या कानावर घातली. परंतु त्याची दखल एसटी महामंडळ घेत नसल्यचे दिसून येत आहे. वरवंड येथे महाविद्यालयात येणाऱ्या विद्यार्थ्यांना बसेसची

### विद्यार्थी व विद्यार्थिनी घरी वेळेवर पोहचत नसल्याने पालकांच्या जीवाला घोर



अडचण सातत्याने भासते आहे. एसटी महामंडळाने नियोजित केलेल्या बस या वेळेवर अनेक ठिकाणी येत नाहीत तसेच उशिराने बस सोडल्यामुळे विद्यार्थ्यांना घरी पोहोचण्यास उशीर होतो.

अनेक गावांमध्ये अद्यापही गाव बसेस जात नाही असे येथील नागरिक खंत व्यक्त करतात. त्यामुळे गावातील विद्यार्थ्यांना व नागरिकांना खाजगी वाहनांची वाट बघत बसावे लागते. दळणवळणाच्या सुविधेचा विलंब हा विद्यार्थ्यांना अभ्यास आणि मानसिकता यावर परिणाम करणारा ठरतो याची दखल घेतली जावी. स्थानकावरुन निघणाऱ्या परतीच्या बस वेळेवर पाठवाव्यात कारण पुन्हा गावाकडे येण्यासाठी उशीर झाल्यास विद्यार्थ्यांची हाल होते यावर लक्ष देण्याची गरज आहे.

दौंड आगारप्रमुख यांच्याशी भ्रमणध्वनी वरुन संपर्क साधला असता, विद्यार्थ्यांचे कोणतेही शैक्षणिक नुकसान होणार नाही, घरी जाण्यासाठी वेळेवर बस सोडण्यात येत आहेत. टायमिंगचा सर्वे करून टायमिंगला बस सोडण्यासाठी कंट्रोल रुमला याबाबत सूचना दिल्या आहेत.

**-प्रतिक अंकी, आगारप्रमुख दौंड**

# व्यवसायिकांसाठी खुशखबर

सांगली,कोल्हापूर,सातारा,सोलापूर,पुणे,
अहमदनगर सह संपूर्ण महाराष्ट्रात
डिजिटलच्या माध्यमातून तब्बल सात लाख वाचकांपर्यंत
पोहोचणाऱ्या दैनिक **हॅलो प्रभात** सोबत
आपल्या व्यवसायाची जाहिरात करण्याची...



## सुवर्णसंधी



| जाहिरात साईज | प्रसिद्धी कालावधी | किंमत |
|---|---|---|
| 08X05 cm | संपूर्ण महिना | ५000/- |
| 08X10 cm | संपूर्ण महिना | ७000/- |
| 12X10 cm | संपूर्ण महिना | १0000/- |

टीप : सदर जाहिरातीचे दर हे फक्त डिजिटल आवृत्तीसाठी लागू आहेत.

**शुभेच्छा जाहीरात, जाहीर नोटीस,
छोट्या जाहीराती, टेंडर नोटीस व सर्व प्रकारच्या
जाहीरात प्रसिद्धीसाठी...**

## एकवेळ अवश्य संपर्क साधा

# दै.हॅलो प्रभात

**फोन : 9094277171 / 9011889001**

• छापील प्रत मिळिवण्यासाठी संपर्क : 9021651976